# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

### राष्ट्रीय शके १९३५-३६ (सन २०१३-१४)

भोर, वेल्हे व हवेली या तीन तालुक्यांमधील शिव-प्रदेशातील गावांमधून ज्ञान प्रबोधिनी संस्थेमार्फत ग्राम विकसनाचे काम गेली ५० वर्ष चालू आहे. गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण महिलेच्या आत्मनिर्भरतेसाठी व प्रबोधनासाठी 'ती'च्या जीवनातील महत्त्वाच्या विषयांवर व 'ती'च्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांसाठी काम केले. किशोरी, युवती, नव विवाहिता म्हणजे हिरकणी आणि ज्येष्ठ महिला अशा ४ वयोगटातील महिलांसाठी वयोगटानुसार विविध विषयांवर उपक्रमांची योजना केली.

आरोग्य, स्वयंरोजगार, बचत गट आणि छोटे उद्योग त्यासाठी अर्थिक साक्षरता, या विषयांवरच्या उपक्रमांची योजना करुन, सहभागामुळे स्थानिक महिलांचा पुढारपणातला सहभाग वाढवणे व तिच्यातील विविध कौशल्ये आणि क्षमतांचा विकास 'ती'च्या प्रबोधनासाठी व्हावा असा प्रयत्न गेली काही वर्ष चालू आहे. या उपक्रमांमुळे आत्मविश्वास तर वाढेलच आणि तिचे व्यक्तिमत्त्वही संपन्न होईल अशी अपेक्षा आहे. याचा परिणाम म्हणून ती तिचे स्वतःचे प्रश्न सोडवून, भागातील प्रश्नांवर उत्तर काढण्यासाठी काही कृती करेल यासाठी वातावरण निर्मिती करुन विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करणे, क्षमता संवर्धनासाठी मदत करणे या गोष्टी अव्याहतपणे चालू आहेत. ग्रामीण महिलेच्या आयुष्याच्या चारही टप्प्यांसाठी स्वतंत्र्यपणे हे प्रयत्न चालू आहेत. क्षमता असलेल्या तरीपण कोणाचा तरी पाठिंबा हवा असतो, फक्त 'तू पुढे हो आम्ही तुझ्याबरोबर आहोत ' असा विश्वास तिला देण्याची गरज असते. ते काम आपण सातत्याने करतो आहोत.

अनेक देणगीदार, काही उद्योजक यांनी देणगी रुपाने अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले. नागरिक, व्यावसायिक अशा सर्वांचेच हात या कामाला लागले आहेत. या सर्वांनाच धन्यवाद देत आहोत.

### या वर्षी आपण शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील खालील संख्येसाठी काम केले

| | नियमित संपर्क | प्रासंगिक संपर्क | एकूण संपर्क | गावे |
|---|---|---|---|---|
| किशोरी | २६४ | १५० | ४१४ | २३ |
| युवती | १७५ | १०० | २७५ | १६ |
| महिला | ३५०० | १००० | ४५०० | ५० |
| एकूण | ३९३९ | १२५० | ५१८९ | ८९ |



### किशोरी

**किशोरी विकास उपक्रमः** गेल्या वीस वर्षांपासून बचतगटांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाला आता गटातील महिलांच्या पाठिंब्यामुळे त्यांच्या मुलींपर्यंत पोहोचण्यासाठी आपण यंत्रणा उभी करु शकू असा विश्वास आला आणि गेल्या पाच वर्षांपासून ज्या भागात आपण काम करीत आहोत त्या भागातील किशोरींसाठी १० शाळांमधून काम सुरू झाले आहे.

पुणे जिल्ह्यातील वेल्हे, भोर आणि हवेली तालुक्यातील १० शाळांमधून २५० विद्यार्थिनींपर्यंत हे काम पोहोचले आहे. इयत्ता८ वीच्या वर्गापासून सुरुवात करून त्या वर्गाला१० वीपर्यंत नेले जाते









व १०वीनंतरच्या विद्यार्थिनींना युवती विभागामार्फत संधी प्राप्त करून दिली जाते. १५ दिवसांतून एकदा घड्याळी दोन तासांचा वर्ग असे याचे काम असते. एका शालेय वर्षात १० तासिका होऊ शकतात. त्याशिवायचे काम शिबिरांमध्ये पूर्ण केले जाते. १०वीतील विद्यार्थिनींसाठी स्वयं-अध्यन कौशल्ये व नियोजन कौशल्यांचे तास असतात. तर ८वी ९वीसाठी विविध विषयांवरील तासिका होतात. यात एक पाक्षिक तासिका आशयाच्या आकलनासंदर्भात तर उरलेली पाक्षिक तासिका ही कौशल्याच्या विकसनासाठी असते.दरवर्षी ८वीचा वर्ग किशोरीविकास उपक्रमात नव्याने येतो. यावर्षीचे ८वी-९वीमधील तुकडीचे विषय खालील प्रमाणे होतेः-

**नियमित तासिकांचे विषय** : परिचय खेळ,निरीक्षण कौशल्य, बहुदिश विचार, यक्षप्रश्न, कथावाचन, कथाकथन, संवाद कौशल्ये, मुलाखत घेणे, विज्ञान कथा असे विविध विषय ८वीकरता या शालेय वर्षात निवडले.या वर्षी मुली मण्यांचे आकाशकंदिल, मोतीकामाचे नमुने, विविध कागदांची फुले ही हस्तकौशल्ये शिकल्या.

**कथाकथन स्पर्धाः** साने गुरूजी कथामाला व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमातून सलग तिसऱ्या वर्षी आपण कथाकथन स्पर्धा घेतली. यात ८ शाळांमधून ५० मुली सहभागी झाल्या. सानेगुरूजी कथामालेच्या मा. विद्याताई रानडे आणि त्यांच्या सहकारी या परीक्षक म्हणून उपस्थित होत्या.

**कुसगाव तंबू शिबिर** : नोव्हेंबर महिन्यात कुसगाव येथे ९० किशोरींसाठी तंबूतील शिबिर झाले. कल्याण, माळेगाव, कुसगाव आणि वांगणी या ४ शाळांमधील किशोरी उपस्थित होत्या. शिबिर घेण्यासाठी १८ युवतींनी साहाय्य केले. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांवर जाऊन ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा चालविणाऱ्या मा. गीतांजलीताई देगांवकर यांनी साखर शाळांमधील त्यांचे अनुभव मुलींना सांगितले. श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी जिजाऊंचे चरित्र सांगितले तर कल्याणच्या ऋषिकेश डिंबळे याने छात्र प्रबोधनच्या अंकातील, ग्रामीण भागात महिलांसाठी काम करणाऱ्या कावेरीताईंच्या जीवनावरील लेखाच्या साहाय्याने, एक चांगला तास कसा घ्यायाचा असतो याचे प्रात्यक्षिक युवतींसाठी सादर केले. एखादा लेख, एखादी मुलाखत, एखादे चरित्र घेऊन त्याच्या आधारे मुलांसाठी चांगल्या मूल्यांची तासिका कशी घेता येते, हे त्याने प्रात्यक्षिक करून दाखविले.

**गावपातळीवरील शिबिरेः** प्रबोधिनीच्या निगडी नवनगर विद्यालयाच्या अग्रणी-प्राग्रणी गटातील ६ मुले व १० मुली मिळून ८ गावातून शिबिरे घेतली. ( कोंढवली, खांबवडी, विंझर, कल्याण, अवसरवाडी, कुसगाव, गाऊडदरा) या गावांमधून २०० मुला-मुलींची शिबिरे घेतली.

**विज्ञान प्रयोगः** विंझर आणि वरवे या शाळांमधून इयत्ता ८वीच्या मुलामुलींसाठी ज्ञानसेतू या उपक्रमातील कार्यकर्त्यांनी विज्ञान प्रयोग शिकविले. दोन्ही शाळांमध्ये मिळून १०० मुला मुलींनी याचा लाभ घेतला.

**विद्याव्रत संस्कार कार्यक्रमः** वरवे व विंझर गावांमधील माध्यमिक विद्यालयात ऑगस्ट २०१३ मध्ये विद्याव्रत कार्यक्रम झाले. संवादिनीच्या विद्याव्रत घेणाऱ्या गटाने विद्याव्रताची व्याख्याने घेतली. वर्वे येथे प्रबोध उद्योग समूहाचे मा. नंदकुमार कानडे आचार्य उपस्थित होते. तसेच विंझर येथे मा. नाना फडके व मा. सुभाषराव देशपांडे आचार्य होते. त्यांच्या हस्ते मुला-मुलींना व्रतचिन्ह देण्यात आले.

**सकस आहार प्रकल्प** : साखर या गावातील शाळेमधील इयत्ता८ वीच्या विद्यार्थिनींसोबत ४० दिवसांचा सकस आहार प्रकल्प आपण केला. मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासले. सकस आहार तयार करून रोज शाळेच्या मधल्या सुट्टीमध्ये असा आहार समक्ष त्यांना खायला द्यायचा, तसेच आहाराचे महत्व व आरोग्य या विषयावरील त्यांच्या शिक्षणासाठीच्या तासिका घ्यायच्या, असे या प्रकल्पाचे स्वरूप होते. वैद्य मनिषा उपाध्ये यांनी या प्रकल्पाचे काम पूर्ण केले.



सकस आहार प्रकल्प : डॉक्टरांकडून धडे घेताना किशोरी



तंबू शिबिरात जिजाउंचे चरित्र ऐकताना किशोरी



'उमलत्या वयाशी जुळवून घेताना':- वयात येताना होणाऱ्या बदलांविषयी जाणून घेताना

" उशीर झाला म्हणून मला बाबांनी गाडीनं इथपर्यंत सोडलं. मी उशीरा शिबिराला आलेय कारण आज माझ्या आईचे वर्ष श्राद्ध होते. घरात करणारे कोणीही नाही. सगळे उरकून मी शिबिरासाठी आलेय."..

**प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग** : निवासी शिबिरात व मेळाव्यात आलेल्या किशोरींनी गावपातळीवर शिबिरे घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यासाठी अशा ३२ जणींचे प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. ९ एप्रिल २०१४ रोजी शिवापूर येथे गावपातळीवरील शिबिरे घेण्याविषयीचे त्यांचे प्रशिक्षण झाले. त्याचवेळी श्री. संजीव तागडे व मा. करंदीकर सरांचे कृषि तांत्रिक विद्यालयातील लेथ मशीनच्या वर्गाविषयी बोलणे झाले. सुनिलाताई गोंधळेकर यांनी प्रसंगनाट्यावरील सत्र घेतले. गावांमधून गावपातळीवर महत्त्वाच्या असणाऱ्या विविध विषयांवरील प्रसंगनाट्ये मुलींनी बसवली.

**किशोरी विकासच्या विद्यार्थिनींनी घेतली गावपातळीवरील शिबिरे** : किशोरी विकास प्रकल्पातील दहावीची परीक्षा झालेल्या तुकडीतील २० जणींनी १४ गावांमधील २२५ किशोर-किशोरींची गावपातळीवरील दोन दिवसांची व एक दिवसाची शिबिरे घेतली. दिवसभर झालेल्या या शिबिरांमध्ये बैठे व मैदानी खेळ, पद्ये, गोष्टी, प्रबोधिनीच्या कामाचा परिचय आणि पुस्तक वाचन असा कार्यक्रम झाला. मुलींची अंधश्रद्धा, मुलगी वाचवा, व्यसनाधीनता,हुंडाबळी या विषयांवरील प्रसंगनाट्ये बसवली व सादर झाली.किशोरवयात नेतृत्वगुण विकसन करण्यासाठी ह्या उपक्रमाची आखणी केली होती.

**गावपातळीवरील सायंकालीन दले :** दिवाळी व मे महिन्याच्या सुट्टीत ९ किशोरी आणि १८ युवतींनी एकूण ९ दले सुरु केली. ही दले सायंकाळी एक ते दोन तास चालतात. यात मुलींचे खेळ, पद्ये व पुस्तक वाचन असा कार्यक्रम असतो. **११ वी प्रवेशास मदत:** किशोरी विकास उपक्रमातून १०वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ४ किशोरींना यावर्षी प्रथमच आपण त्यांच्या महाविद्यालयीन प्रवेशासाठी मदत केली. संगणकाच्या साह्याने परीक्षेचे अर्ज कसे भरायचे, विषयांच्या निवडीबद्दलचे मार्गदर्शन कोणाकडून घ्यायचे, कोणत्या महाविद्यालयात प्रवेशासाठी प्राधान्यक्रम कसा द्यायचा असे सर्व प्रकारचे साहाय्य केले. त्यांच्यासाठी करियर गायडन्सची सत्रे दहावीच्या परीक्षेनंतर लगेचच आयोजित केली होती. शेतकरी कुटुंबातल्या कमी शिकलेल्या पालकांच्या मुलींसाठी अशी मदत उपलब्ध झाल्यास त्या १०वीच्या पुढे शिकतात. त्यामुळे ही मुलींच्या शिक्षणासाठी मदत ठरते. ती मदत तिच्या आयुष्याला वळण देणारी ठरते.

यावर्षी फी भरायला किंवा शाळा कॉलेजच्या प्रवासाला पैसे नाहीत म्हणून ज्यांचे शिक्षण थांबत होते अशा ३ जणींना आपण शिष्यवृत्ती दिली.

**महाविद्यालयीन तासिका:** अपूर्वा राणे या आपल्या कार्यकर्तीने विंझर महाविद्यालयात१० तर वेल्हे महाविद्यालयात ७ तासिका या घेतल्या. यामध्ये अनुक्रमे ३५ आणि १५ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महिन्यातून एकदा११ वीतील विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाची तासिका घेणे असे याचे स्वरूप होते.

परस्पर परिचयापासून सुरवात करून सामाजिक जाणीव जागृती, स्वतःच्या क्षमतांचे मूल्यमापनकरणे, गटकार्य, अशी सत्रे घेतली गेली. वेल्हे तालुक्यातील गावांमधील या मुलींनी अन्य गावांमध्ये जाऊन सायंकालीन दले घेतली.

> 'ताई, मला सायकल मिळाली. ती चालवत मी रोज शाळेत जाते. घरचे म्हणत होते, की आता शाळा बंद. तुला सोबत रानातून शाळेत जायला मैत्रिण नाही. पण ही सायकल माझी मैत्रिण झाली. जायला वेळ कमी लागायला लागला, म्हणून आई-वडिलांनी परवानगी दिली. आता मी शिकू शकते......'
>
> बोरावळे गावातली एक विद्यार्थिनी



जास्वंद वर्गातील शिवणाची तासिका

## युवती

युवतींसाठीच्या उपक्रमांमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या आणि काही कारणाने शिक्षण अर्धवट सोडायला लागलेल्या युवतींसाठीचे उपक्रम आहेत. मुख्यतः विविध कौशल्यांच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि त्यांना स्वतःसाठी आणि स्वतःच्या कुटुंबासाठी काही पैसे मिळवता ग़ावेत यासाठी विविध कौशल्य वर्ग घेतले जातात. ज्यांचे शिक्षण चालू आहे अशांसाठी मासिक व्यक्तिमत्त्व विकसन तासिकांच्या माध्यमातून, तर ज्यांचे शिक्षण चालू नाही अशांसाठी कौशल्ये प्रशिक्षणांच्या वर्गांच्या माध्यमातून हे काम चालते.या वयोगटातील युवती सकारात्मक, चांगल्या कामामध्ये गुंतून राहिल्याने त्यांचे लग्नाचे वयही आवश्यक तेवढे पुढे जाते.

**जास्वंद वर्ग :** ज्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची संधी मिळालेली नाही किंवा काही कारणाने शाळा अर्धवट सोडावी लागली, अशांसाठी प्राधान्याने हे वर्ग सुरू केले. आठवड्यातून ४ दिवस रोज ४ तास, याप्रमाणे ४ महिने एकत्र येऊन काही हस्त कौशल्ये व काही जीवनावश्यक कौशल्यांचा एक वर्ग आपण गेली ५ वर्षे घेत आहोत. आजवर सुमारे २५० युवतींनी या वर्गाचा लाभ घेतला. आजपर्यंत असे ८ वर्ग पूर्ण झाले व ९ वा वर्ग चालू आहे.



गावपातळीवरील दलासाठीचे प्रशिक्षण

या वर्गात शिवण शिकवले जाते. मेंदी, रांगोळी, आणि विविध वस्तू बनवायला मुली शिकतात. विविध तोरणे व माळाही शिकवल्या जातात.याचसोबत मण्यांचे काम असते. आकाशकंदिल व राख्या असे हस्तकला कौशल्य शिकवले जाते. संवाद कौशल्याच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकसन असा विषय असतो. बालवाडी, आंगणवाडीच्या प्रशिक्षकांना आवश्यक काही कौशल्ये त्या शिकतात. यातच त्यांनी गावपातळीवर आंगणवाडीच्या वयोगटातील मुलांची शिबिरे घ्यायची असतात. गावातील किशोरवयीन मुला-मुलींची शिबिरे घेण्यासाठी त्या मदत करतात. किशोरवयीन मुलांची शिबिरे आणिआंगणवाडीच्या वयोगटातील मुलांची शिबिरे त्या गावपातळीवर आयोजित करतात. यातून त्या नियोजन कौशल्य आणि संवाद कौशल्य शिकतात.



दक्षतासमितीचा गावपातळीवरील जागृती मेळावा

या मुलींनी वर्षभरात भाग घेतलेले उपक्रम पुढील प्रमाणे:-

- गावातील आंगणवाडीत १५ दिवस मुलांचे विविध उपक्रम घेण्याचे प्रात्यक्षिक केले.
- गावांमधून वय वर्षे ७ ते वय वर्षे१५ यावयोगटातील मुलामुलींसाठी गावपातळीवरील२दिवसांची शिबिरे आयोजित करण्यास मदत केली.
- गावांमधून संध्याकाळच्या वेळेला चालणारी खेळाची दले चालविली.
- आपल्या गावापेक्षा लांबच्या गावात जाऊन अशी मुला-मुलींची सायंकालीन खेळाची दले सुट्टीच्या वेळात साधारण ६० दिवस रोज दीड तास या प्रमाणे घेतली.
- मेंदीच्या मेळाव्यांमध्ये गावांमध्ये सहभाग घेतला.
- गावांमध्ये गावपातळीवरील वाचनालये चालविली.

**गडांवरील सहली :** राजगड, तोरणा परिसरात राहात असूनही प्रतिकूलसामाजिक वातावरणामुळे मुलींचे गडावर जाणे होत नाही. आपल्या प्रकल्पातून यावर्षी ३५ जणींची राजगड येथे सहल जाऊन आली. घिसर, वीरवाडी, वांगणी, कोदवडी, वाजेघर आणि साखर अशा ६ गावांमधून युवती आल्या होत्या. या सहली नंतर बाहेरगावांहून आलेल्या प्रबोधिनीच्या पाहुण्याबरोबर अशा सहलींच्या मार्गदर्शिका म्हणूनही ४ जणींनी काम केले.



गडावरील सहल . . . का गडावर स्वारी ?

**कार्ले- भाजे लेण्यांची सहल :** वेल्हे तालुक्यातील विविध वर्गातील युवतींची कार्ले - भाजे येथील लेण्यांना सहल गेली. यामध्ये सहभागी काही युवती तर प्रथमच रेल्वेने प्रवास करीत होत्या. तिकीटे काढण्यापासून सहलीतील प्रवास व भोजनाच्या व्यवस्थेमध्येही मुलींनी प्रथमच सहभाग घेतला. लेण्याजवळील एका बालग्रामला त्यांनी भेट दिली व अनाथ मुलांसाठी चालू असलेला प्रकल्प पाहून त्यांच्यात गटचर्चा झाली.

**साहाय्यक परिचारिका वर्ग:**६ गावांमधील एकूण १४ जणींनी हा वर्ग पूर्ण केला. प्रथमच दुर्गम भागातील काही गावांमधील युवती प्रबोधिनीच्या आंबवणे केंद्रामध्ये तीन महिने मुक्कामी

असा झाला माझ्यात बदल
'अभ्यास सहलीला आले आणि पहिला रेल्वेप्रवास केला. रेल्वेचे तिकीटही पहिल्यांदाच काढले. मी १८ वर्षांची झाले तरी घरातल्यांना सोडून कधी एकटी कुठे गेलेच नव्हते.'

....... एक युवती

" मी तर माझ्या आरोग्याची काळजी घेतेच पण माझ्या गावातल्या आणि गावाबाहेरच्याही ३०हून जास्ती जणांना मी सुरक्षित बाळंतपण व्हावं म्हणून दवाखान्यापर्यंत पाठवले. मी हे व्रत घेतलंय. प्रबोधिनीतच शिकले ना मी हे."

**.....वेल्हे तालुक्यातील आरोग्य प्रबोधिका**

राहिल्या व त्यांनी हा वर्ग पूर्ण केला. हा वर्ग पूर्ण केलेल्यांना रुग्णालयात परिचारिकांना साहाय्य करण्याचे काम लगेचच मिळू शकते. आजवर अशा १५० विद्यार्थिनींनी हा वर्ग पूर्ण केला असून त्यातील ८० % मुली या कुटुंबाला आर्थिक आधार देत आहेत. दरमहा रू. ३०००/- पासून १२,०००/- पर्यंत त्या स्वतः कमावत आहेत. पुणे, शिरवळ,नसरापूर या ठिकाणी त्या काम करीत आहेत. **या वर्गातील ७ विद्यार्थिनींना आपण प्रवासाच्या खर्चासाठी तसेच निवासासाठीच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती दिली. या शिष्यवृत्तीमुळेच त्यांना हा वर्ग पूर्ण करता आला.**

**समकक्ष परीक्षा:** दुर्गमता, परिस्थिती आणि विकासाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिले आहे, अशा ग्रामीण महिलांसाठी व युवतींसाठी यशवंतराव चव्हाणमहाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे परीक्षा आयोजित केल्या जातात. यासाठी दहावी आणि बारावीच्या समकक्ष ठरतील अशा परीक्षांना मागच्या वर्षांमध्ये ३० जणींना आपण बसविले. या वर्षी ३०जणींनी दहावी समकक्ष व१५ जणींनी १२वी समकक्ष ही परीक्षा दिली. या परीक्षेसाठी कल्पनाताई कुलकर्णी, सुनीलाताई गोंधळेकर व जयंतराव गाडगीळ यांनीत्यांना मार्गदर्शन केले.

**शिक्षण तसेच स्वयंरोजगाराचा लग्नाच्या वयावरील परिणाम:** मृण्मयी सातपुते या पुण्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या युवतीने ग्रामीण भागातील युवतींच्या मुलाखती घेऊन तसेच त्यांना प्रश्नावली सोडविण्यास देऊन एक अभ्यास पूर्ण केला. यात मुलीचे शिक्षण, तिच्या पालकांचे शिक्षण व स्वयंरोजगार अशा सर्व गोष्टींचा परिणाम तिच्या लग्नाच्या वयावर कसा होतो, हे पाहण्याचा प्रयत्न केला. तिने वेल्हे तालुक्यातील ८ गावांमधील १०० मुलींच्या मुलाखती घेतल्या. यात तिला असे आढळून आले, की जी युवती शिकली आहे, कुटुंबाकरिता काही आर्थिक रोजगार मिळवीत आहे, तिच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे, आणि विवाहाबाबतची तिची दृष्टी थोडी बदलते आहे. तिचे लग्नाचे वय किमान १८ पर्यंत किंवा अधिक पुढे सरकले आहे.

**मार्च मेळावा :** महिलादिनानिमित्त आयोजित युवती मेळाव्यामध्ये आंबवणे येथे जास्वंद वर्ग, साहाय्यक परिचारिका वर्ग, तसेच ब्युटी पार्लर वर्ग, शिवण वर्ग अशा विविध वर्गांच्या युवतींचा मेळावा झाला. याला महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या. आंबवणे गावाचे सरपंच, उपसरपंचा, तंटामुक्ती अभियानाचे अध्यक्ष असे पाहुणे कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या वेळी वेगळी वाट चोखाळणाऱ्या ८ युवतींचा सत्कार करण्यात आला. यात पोलीस, वकील, साहाय्यक परिचारिका वर्ग पूर्ण करणाऱ्या, विविध सामाजिक काम करणाऱ्या अशा स्थानिक युवतींचा समावेश होता.

**गावपातळी वरील दल :** ९ गावांमधून १४ युवतींनी मिळून रोज सायंकालीन दले घेतली. दल घेण्यासाठी येणाऱ्या मुलींचे दोन वेळा प्रशिक्षण झाले. यात विविध बैठे व मैदानी खेळ तसेच मैदानावरील आज्ञांचे प्रशिक्षण झाले. सुट्टीमध्ये दल घेणाऱ्यांची पाक्षिक बैठकही होत होती.

**वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्वविकसन :** छात्र प्रबोधनच्या साहाय्याने वेल्हे तालुक्यातील कुरंगवडी या गावातील मुलांकरिता वाचनाद्वारे प्रशिक्षणाचे सत्र होते. छात्र प्रबोधन मासिकातील लेखांच्या प्रकट व मौन वाचनातून मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण करणे, त्यांचे भावविश्व समृद्ध करणे असा उपक्रम ऑक्टोबर पासून चालू आहे. वीरवाडी गावाची अस्मिता शिळीमकर ही तासिका घेते. छात्र प्रबोधनच्या सुलभाताईंचे मार्गदर्शन तिला होते.

**नवा पायंडा:** गेल्या तीन वर्षांपासून आपण वेल्हे, शिवापूर भागामध्ये पौरोहित्य विभागाच्या मदतीने पारंपरिक रित्या करीत असलेल्या पूजा आणि संस्कारांचा आधुनिक काळातील काय संदर्भ आहे, ते जाणून घेत आहोत. तो जाणून घेऊन आणि ग्रामीण पार्श्वभूमी जाणून गावामधील तरुणी आणि महिला करीत असलेल्या ३ प्रकारांच्या पूजा - हरतालिका, वटपूजन,वैभवलक्ष्मीचे पूजन अशा तीनही प्रकारच्या पूजा आपण महिला पुरोहितांच्या मदतीने गावात सांगितल्या. यामध्ये, १. महिलाही पुरोहिता असू शकतात व त्या पौरोहित्य करू शकतात, २. आपण जी पूजा किंवा संस्कार करणार असतो, त्यांचा अर्थ समजून घेऊन ती पूजा करायची असते. या दोन गोष्टी ग्रामीण भागातील महिलांवर ठसल्या.सलग तिसऱ्या वर्षी ७ गावांमध्ये मिळून हरतालिका

**'उमलत्यावयाशी जुळवून घेताना'.. कार्यशाळा**

ग्रामीण भागातील किशोरींसाठी वयात येताना होणाऱ्या बदलांविषयीची माहिती सातत्याने गेले ३ वर्षे आपण देत आहोत. या वेळी हे प्रशिक्षण देताना मुली अधिक मोकळेपणाने बोलल्या. परिचीत, जवळच्या पुरुषांकडून होणाऱ्या लैंगिक शोषणाला यानिमित्ते वाचा फुटली.

आजवर आपल्या कार्यक्षेत्रातील २० शाळांमधील २,५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत आपण पोहोचत आहोत.



आम्ही ओरीगामी शिकलो.
.. प्रशिक्षक प्रशिक्षण

'पहिल्यांदाच प्रबोधिनीच्या युवती वर्गात येण्यासाठी मी गावाबाहेर पडले आणि एस.टी. ने प्रवास केला. खूप भीती वाटत होती, पण धाडस केले. आता गडांवरच्या सहलीतही भाग घेतला. एकटीने सगळी कामे करण्याचा विश्वास आला. '

......... युवती वर्गातील
एक युवती.

पूजन, वैभव लक्ष्मी पूजन आणि वटपौर्णिमा अशा ७ पूजनांमध्ये १७८ जणी सहभागी झाल्या.

**कमवा आणि शिका :** रुग्णालयांमधून सध्या मदतनीसांची वाढती मागणी आहे. यामुळे आपल्या भागातील युवतींना काम शिकतानाच पैसे मिळवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ही माहिती घेऊन अनेक युवतींपर्यंत आपण पोहोचलो. याा वर्षी ५० युवतींपर्यंत ही माहिती पोहोचवली. यातून सध्या ८ युवती दीनानाथ रुग्णालयापर्यंत पोहोचल्या. पूर्णवेळेचे काम व विद्यावेतन असे या कामाचे स्वरूप आहे.

> "आधी आम्ही संक्रांतीचे हळदी-कुंकु करायचो. आता आम्ही तिळगुळ समारंभ करतो. म्हणजे मग आमच्यातल्या काही जणींना वगळावे लागणार नाही."

## महिला

**गुंजवणी खोऱ्यातील कामावर भर :**विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिली आहेत अशा गावांमध्ये कामाचा जोर वाढविण्याचे यावर्षी आपण ठरविले. शिवगंगा खोऱ्यातील तुलनेने विकसित गावांपेक्षा वेल्हे तालुक्यातील व मावळातील दुर्गम आणि मधल्या टप्प्यातील गावांवर यावर्षी भर देण्याचे ठरविले. काम चालू असलेल्या गावांचे विकासाच्या दृष्टीने तुलनेने विकसित व पायाभूत सुविधा असलेल्या गावांकडून( अ आणि ब) , दुर्गम व अविकसित गावांना (क आणि ड) कामाचा विषेश भर दिला आहे.



हिरकणी प्रशिक्षण : मुलांच्या वाढीसाठी असंही काहीतरी करावं लागतं तर. . .

**हिरकणी**: मातांचे प्रशिक्षण **:** ज्यांची मुले ० ते ३ या वयोगटातील आहेत, अशा मुलांच्या मातांसाठी जानेवारी १४ पासून एक मासिक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला. या वयोगटातील महिलांना '**हिरकणी**'असे नाव देण्यात आले. ग्रामीण भागातील मातांचे बाल संगोपनाबरोबरच मुलांच्या निकोप- शारीरिक-बौद्धिक-मानसिक वाढीसाठी त्यांच्या भोवताली उपलब्ध साधनांमधून त्या कशाप्रकारे मुलांचे संगोपन करू शकतात, मुलांचे आरोग्य, त्यांचे इंद्रिय विकसन, शारीरिक व बौद्धिक वाढीसाठी आवश्यक खेळ व विविध उपक्रम यांविषयीचे मातांचे प्रशिक्षण दरमहा घड्याळी २ तासांमध्ये होत आहे. आजपर्यंत वांगणी (२) आंबवणे(१) व शिवापूर (२) तर गाऊडदरा येथे (४) प्रशिक्षणवर्ग झाले.यात वांगणी (१५) आंबवणे(१५) शिवापूर (१२) तर गाऊडदरा ( ३०) अशा महिला प्रत्येक वर्गामध्ये सहभागी होत्या. या वर्गाला वैद्य मनिषा उपाध्ये यांन मुलांचे आरोग्य व आहार याविषयी मातांनी घ्यायची काळजी तर तृप्तीताई कुलकर्णी यांनी इंद्रिय विकासन व शैक्षणिक साधने यावर मार्गदर्शन केले.

**संक्रांत मेळावे :** गाउडदरा, श्रीरामनगर, कल्याण, रहाटवडे, बोरावळे, कुसगाव,खोपी, निधान, सांगवी आणि शेनवड अशा गावांना संक्रांत मेळावे झाले. त्यांना ३५० महिला उपस्थित होत्या. या मेळाव्यांमधून त्या त्या गावातील बचतगटांच्या हिशोबावर व त्यातील प्रश्नांवर तसेच घडलेल्या चांगल्या गोष्टींवर चर्चा झाली.

**नसरापूर संवादिनी**: पुण्यात चालू असलेल्या संवादिनी या महिलांच्या सामाजिक चळवळ करणाऱ्या गटा प्रमाणेच ग्रामीण भागातील महिला त्या भागातील संवादिनी चालू करू शकतील का, हे पाहण्यासाठी या वर्षी जानेवारी महिन्यापासून असा एक प्रयोग नसरापूर येथे सुरू झाला. जानेवारी पासून सुरवात करून अशा बैठका या वर्षी झाल्या. ग्रामीण भागात थोडासा वेळ आणि काम करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांनी एकत्र येऊन आपला वेळ व शक्ती काही स्थानिक सामाजिक कामासाठी उपलब्ध करायची, असे या कार्यक्रमाचे स्वरूप असेल. तसेच त्यांनी हे काम करताना स्वतःच्या अभ्यासासाठीही काही उपक्रम करावेत अशी कल्पना आहे. या कार्यक्रमाला तृप्तीताई कुलकर्णी आणि मनिषाताई उपाध्ये या प्राथमिक सहकार्य करीत आहेत.

> **आणि त्यांनी तसे करण्याची हिंमत दाखवली!**
>
> "माझ्या मुलीच्या लग्नात मी तिकडच्या लोकांना सांगितले. माझ्या मुलीच्या आणि तुमच्या मुलाची रक्ताची तपासणी करून त्याचे निर्णय पाहुया. पत्रिका पाहून लग्न करण्यापेक्षा ते जास्ती उपयोगाचे होईल."
>
> आरोग्य प्रबोधिका, प्रबोधिनी

## आरोग्य

**आरोग्य तपासणी :** प्रबोधिनीतर्फे चालू असणाऱ्या गरोदर महिला मासिक तपासणीमध्ये या वर्षी ६५ गावांमधून ६०० महिला तपासणीसाठी आल्या.

तसेच पॅप टेस्टसाठी ४५ जणी आल्या. डोळे तपासणीच्या दोन शिबिरात ७० जणी व हिमोग्रॅम तपासणीसाठी १०० जणी आल्या होत्या.

**ताणाचा अभ्यास:** गरोदर महिलांवर गरोदरपणात काही मानसिक ताण असतात का, याचा एक अभ्यास या वर्षी झाला. यासाठी कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि परिस्थितीजन्य अशा काही मुद्यांवरील प्रश्नांची प्रश्नावली आपल्या आंबवणे केंद्रात तपासणीसाठी येणाऱ्या व त्या भागातील अन्य काही महिलांकडून सोडवून घेण्यात आल्या. अशा ६५ महिलांचा अभ्यास या निमित्ताने करण्यात आला.



संक्रांत मेळावा

**एकात्मिक बालविकास प्रकल्प, वेल्हे यांच्याबरोबर काम**

**१)कौटुंबिक समुपदेशन :** वेल्हे तालुक्यातील ८ गावांमध्ये कौटुंबिक समुपदेशनाचे कार्यक्रम झाले. यावेळी सरासरी ३० महिला गावात उपस्थित होत्या. यामध्ये महिलांचे हक्क, त्यांच्याविषयीचे कायदे व महिलांनी विवाह ठरवताना व करताना घ्यावयाची कायदेविषयक काळजी अशा विषयांवर मार्गदर्शन झाले. कल्पनाताई कुलकर्णी व संवादिनीच्या सदस्या अंजलीताई भिडे यांनी सत्रे घेतली. गावागावातील कौटुंबिक अस्वास्थ्याचे मुद्दे या निमित्ताने एकत्र झाले.

**२) उमलत्या वयाशी जुळवून घेताना :** "उमलत्या वयाशी जुळवून घेताना" असे शीर्षक असलेली पौगंडावस्थेतील प्रश्नांसाठी समुपदेशन व सल्ला देणारी सत्रे वेल्हे तालुक्यातील मंजाई आसनी, वडगाव झांजे, वाजेघर आणि साखर येथे झाली. त्याला ६५० विद्यार्थी उपस्थित होते.



"नवा पायंडा." . . . वटपौर्णिमेचीपुजा
स्त्री पुरोहिताही सांगू शकतात

## आर्थिक साक्षरता

**बचत गट :** ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने चालणाऱ्या बचत गटांचे दैनंदीन व्यवस्थापन जिजामाता प्रबोधन केंद्राद्वारे केले जाते. सध्या ३८ गावांत २९० गटांमध्ये ५३०३ सभासद सहभागी आहेत. या सर्व गटांची मिळून दरमहा बचत रु. ९.६८ लाख जमा होते. बरेचसे गट सरासरी ३ वर्षांचे एक आवर्तन करतात. मार्च २०१४ अखेर सर्व गटांनी मिळून गट सुरू झाल्यापासून रु. १,८५,८६,८५०/- ची बचत केली तर कर्ज रु. ४,५६,७३,७११/- परस्परांना दिले.

**नाबार्ड अ‍ॅड ऑन प्रकल्प:** राष्ट्रीय कृषी व ग्राम विकास बँके सोबत येत्या वर्षांमध्ये नवीन बचतगट करण्याचे आपण ठरविले आहे. या कामाला सुरवात झाली असून शिवगंगा गुंजवणी खोऱ्यामध्ये असे ७० गट तयार झाले आहेत.

**आर्थिक साक्षरता अभियान:**

**पार्श्वभूमी**: सन २०१० पासून आपण आपल्या बचतगटांमार्फत आर्थिक साक्षरतेचे अभियान करतो आहोत. या अभियाना अंतर्गत रिझर्व बँक ऑफ इंडियासोबत आपण ११ गावांमध्ये आर्थिक साक्षरतेसंदर्भातील जाणीव जागृतीचे कार्यक्रम गावकऱ्यांसाठी केले. या ११ गावांमधून खोपी या गावाची आदर्श गाव योजनेसाठी निवड झाली. या गावातील सर्व २४२ घरांमधील २४२ खाती सेंट्रल बँक ऑफ इंडिया वेळू,येथे काढली गेली. या कामानंतरही आज पर्यंत आर्थिक साक्षरते विषयीची जागृती मोहीम आपण चालू ठेवली आहे.

* **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या तज्ज्ञ गटाची खोपी गावास भेट :** देशातील गरीब माणसास उपजीविकेसाठी काही नवीन पर्याय संस्था / संघटना सुचवू शकतात का?, हे पाहण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील महाराष्ट्रभरामधील संस्थांमधून ज्या नव उपक्रमांचे प्रयत्न झाले त्यांची स्पर्धा महाराष्ट्र सरकारतर्फे घेण्यात झाली. यात महाराष्ट्रभरातून ३५० संस्थांनी सहभाग घेतला. त्यातील ३८ संस्थांचे काम विषेश नावाजले गेले. यात ज्ञान प्रबोधिनीच्या खोपी या गावात महिलांनी सर्व गाव हे बँकेशी जोडले त्या
" आर्थिक समावेशन " प्रकल्पाचा समावेश होता. राष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचा गट हे काम पाहायला गावात आला होता. त्यांनी आपल्या आर्थिक साक्षरतेच्या महाराष्ट्रातील कामाचा समावेश ३५० पैकी पहिल्या ३८ कामांमध्ये केला. या कामाचे सादरीकरण करायला सुवर्णताई गोखले

* " मी पारंपरिक खेळांमध्ये भाग घेणारच नव्हते. यजमानांना जाऊन बरीच वर्षे झाली. घराबाहेरही पडत नव्हते. पण गटामुळे सगळे जमले. खेळ करताना कुंकु लावायचे रंगित लुगडे नेसायचे होते. पण माझ्या घरच्यांनी मला धीर दिला. अगं, चांगल्याकामासाठी,आपल्या गावाकडचे खेळ सगळ्या पुण्यासमोर, शहरासमोर येण्यासाठी तू चालली आहेस. हो तू म्होरं . माझ्या मुलानेच माझे खेळातले फोटो सगळ्या गावात दाखवले.
एरवी गणेशोत्सवात पारंपरिक खेळांमध्ये असा भाग मी घेतलाच नसता." हा सगळा कामाचा परिणाम !
......... पारंपरिक खेळातील एक महिला.

बेलापूर येथे गेल्या होत्या.

**महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM):**

क्षेत्र कार्य प्रशिक्षण: महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान या महाराष्ट्र सरकारच्या अभियानासोबत काम करताना त्यांच्या तालुका पातळीवरील निर्णय करणाऱ्या २० अधिकाऱ्यांचे क्षेत्रकार्यासंदर्भातील एक प्रशिक्षण ज्ञान प्रबोधिनीत झाले. यात त्यांनी श्रीरामनगर, कुसगाव, शिवापूर, खोपी, सांगवी आणि आंबवणे या गावांचा त्यांनी अभ्यास केला. बचतगटांमधील महिलांच्या घरी त्यांनी मुक्काम केला. गावातील उपजीविकेची उपलब्ध साधने व नव्याने ज्याच्यावर उपजीविका करता यईल अशी संभाव्य साधने यांचा त्यांनी अभ्यास केला. विविध सरकारी योजना येऊनही गावातील माणूस गरीब राहिला याचे खरे कारण शोधता येईल का, असा या अभियानाचा हेतू आहे. नोव्हेंबर महिन्यातील १५ दिवस हे अधिकारी आपल्या गावांमध्ये राहिले.

* या अभियानातर्फे गावपातळीवरील कार्यकर्तीला वापरता येईल अशी एक पुस्तिका तयार करण्याचे काम करण्यात आले. बचतगटातील महिला व गावपातळीवरील सदस्यांना आर्थिक व सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने ज्या गोष्टी किमान माहिती असायला हव्यात अशा गोष्टींवरील पुस्तकांचे लेखन झाले. य़शदातर्फेआयोजित या साधन निर्मितीच्या कार्यशाळेमध्ये सुवर्णा गोखले व बागेश्री पोंक्षे यांनी साधन लेखन केले.



श्री. पुराणिक ह्यांची राम सिता पुराणिक तंत्रनिकेतनास भेट

## उद्योजकता

**कृषी पर्यटन:** गेल्या ३ वर्षांपासून आपण ग्रामीण महिलेमध्ये उद्योजकता वाढावी यासाठीचे उपक्रम करीत असतो. यामध्ये उद्योगासाठीच्या संधी त्यांना उपलब्ध करून देतो. या उपक्रमा अंतर्गत या वर्षी कृषी पर्यटन सहली आयोजित करण्यात आल्या. कुसगाव, विहीर, वेल्हे आणि विंझर येथे झालेल्या या सहलींमधून यावर्षी एकूण २०० व्यक्ती गावांमध्ये येऊन गेल्या. साधारण एक लक्ष रुपयांची उलाढाल या उपक्रमातून झाली. एकूण ३ वर्षांमध्ये गावांमधील प्रत्येकी २ ते ५ जणींच्या गटापर्यंत आपण कृषी पर्यटन ही संकल्पना पोहोचवू शकलो आहोत. यावर्षी या पर्यटनाच्या उपक्रमात आपण एक वेगळी कल्पना करून पाहिली. बेंदुराच्या दिवशी रविवार असल्याने गावपातळीवर साजरा होणारा बेंदुर हा बैलपोळ्याचा सण कसा साजरा करतात हे सहलीतील सदस्यांनी गावात जाऊन पाहिले. या निमित्ताने वेगवेगळे सण व उत्सव हे सहलीचे आकर्षण ठरू शकते हे सर्वांना समजले.



ग्रामीण– कृषी पर्यटन: समवयस्कांकडून वीट भट्टीचा परिचय

**उद्योजिका मेळावा:** शिवापूर परिसरातील छोटे छोटे उद्योग करणाऱ्या ४५ जणींचा एक मेळावा बचतगट कार्यालयात झाला. या मेळाव्यासाठी आबेदा इनामदार महाविद्यालयातील डॉ. उपाध्ये या उपस्थित होत्या. उद्योगाबद्दलची माहिती गोळा करणारी एक प्रश्नावली सर्वांनी सोडवली तसेच त्यांच्या अनेक शंकांचे निरसन त्यावेळी प्रश्नोत्तराद्वारे झाले.

**राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन:** अमेरिकेतील डॉ. सुभाषराव पुराणिक हे गेल्या १४ वर्षांपासून शिवगंगा खोऱ्यातील महिलांच्या उद्योजकता प्रशिक्षण वर्गांसाठी सातत्याने मदत करीत आहेत. त्यांनी राम-सीता पुराणिक तंत्र निकेतनाच्या उभारणीसाठी आर्थिक योगदान दिले आहे. त्यांनी यावर्षी प्रशिक्षण घेतलेल्या महिलांच्या गटाला भेट दिली. दीनानाथ रुग्णालयाद्वारे या महिलांच्या गटाला रुग्णालयाला लागणाऱ्या विविध गोष्टी शिवण्याचे काम मिळते. ७ महिलांनी ऑपरेशन थिएटरला लागणारे मास्क, शीट तसेच टोप्या शिवल्या. याची शिलाई रु. १५,००० पेक्षा जास्त मिळाली. याच सोबत ७५ बाळंतविड्यांचे संचही येथे शिवले गेले.त्याची त्यांनी पाहणी केली. हे संच आजही विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

किशोरी विकास उपक्रमात विद्यार्थीदशेपासून सहभाग घेणारी पूर्वाश्रमीची अश्विनी कामठे व नंतरची अश्विनी ठाकर ही आज राम-सिता पुराणिक तंत्र निकेतनाची प्रमुख म्हणून काम करते आहे. तिने तिचे सर्व प्रशिक्षणही याच तंत्र निकेतनातून घेतले होते. तिने तिची गोष्ट

व सहभागी सदस्या ते विभाग प्रमुख हा तिचा प्रवास मा. पुराणिक यांना सांगितला. या संबंधीचा एक लेख महाराष्ट्र फौंडेशनच्या मित्रांना अमेरिकेत तिने पाठविला होता. तो सर्वांना विशेष भावला.

शिवणासाठी २८ जणी वर्गास येऊन गेल्या. वाखाचे प्रशिक्षण ५६ जणींना देण्यात आले.



आर्थिक साक्षरता

## नेतृत्व

### अभ्यास सहली : व्यक्तिविकासाचे एक प्रभावी साधन

कामातील अभ्यास सहलीचे आयोजन आपण व्यक्तिविकासाचे साधन म्हणून गेली काही वर्षे प्रभावीपणे करीत आहोत. देवदर्शनाबरोबरच समाजदर्शनासाठी पदरचे पैसे खर्च करून महिला या सहलींना येत आहेत हे विशेष!

सहलींसाठी रोजच्या वातावरणातून उठून महिला बाहेरगावाला गेल्या की त्या अत्यंत मोकळ्या होतात. रोजची चौकट जाऊन वेगळ्या विचाराच्या समोर जायच्या मनःस्थितीत येतात. बाहेरच्या वातावरणामुळे त्या अनेक गोष्टी शिकतात. कोल्हापूर सहलीला आलेल्या महिलांनी चहासाठी गाडी थांबवायला सांगितल्यावर हॉटेलमधील २०रु. चहा हा भाव पाहून चहा प्यायचे नाही असे ठरविले. जेवताना वाटीभर भाजीचा खर्च हा ७० रु. आहे हे कळल्यावर त्यांना संपूर्ण ताटाचा खर्चही ७० रुपये आला नसेल, असे वाटल्याने जेवण जाईना. या निमित्ताने त्यांना पदार्थांचे भावही कळले आणि आपण जर हे काम केले आणि जेवण बनविले तर आपल्याला किती पैसे मिळू शकतात हे देखील त्यांना समजले.



स्थानिक नेतृत्व घडण : गावपातळीवरील बैठका

मथुरेतील महिलांची स्थिती पाहून महाराष्ट्रातील महिलांची स्थिती तुलनेने किती चांगली आहे याचे त्यांचे शिक्षण झाले. मथुरेच्या कृष्णमंदिरासमोरील मुलांना कृष्णजीवनावरील चित्रांची पुस्तके विकताना पाहून हे २१व्या शतकातले कृष्ण का शिक्षण घेत नाहीयेत असे वाटून त्यांनी त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास केला.

दिल्ली येथे सहलीला गेलेल्या महिलांनी राष्ट्रपतीभवनाला भेट दिल्यानंतर त्यांच्यात झालेला बदल हा शब्दापलीकडचा होता. आम्ही राष्ट्रपतीभवनात जाऊ शकलो. आम्हीही असे महत्त्वाचे काहीतरी करु शकतो. राष्ट्रपतींना पत्र स्वतःच्या हाताने देऊ शकतो हे कळल्यावर त्यांना खूप अभिमान वाटला.

असा सहलींचा एकत्रित परिणाम साधण्यासाठी यावर्षीही सहली आयोजित करण्यात आल्या. वेल्हे तालुक्यातील गुंजवणीखोऱ्यातील गावांमधून १४५ जणींची सहल कोल्हापूर येथे जाऊन आली. सुरेखा दिघे यांनी या सहलीची जबाबदारी घेतली होती. तर शिवापूरचा गट शिर्डी येथे जाऊन आला. रहाटवडे गावाच्या ५०जणी तिरुपतीबालाजीला जाऊन आल्या. अन्य २ गटही तिरूपती बालाजी येथे गेले होते. या सहलीला केळदवाडी पासून निधानसांगवी पर्यंतच्या १७ गावांतील फक्त महिलांनी योजलेल्या सहलीतून जाणे ही आता आपल्या खोऱ्यातील नित्याचीच बाब झाली आहे.

## स्थानिक नेतृत्व करणाऱ्या समितीचे प्रशिक्षण

### विविध बैठकी

स्त्री.श.प्र चे काम सुरळीतपणे चालण्यासाठी विविध प्रकारच्या बैठकी गेली अनेक वर्षे सातत्याने चालू आहेत. त्या बैठकांमधून स्थानिक नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण होत असते.

♦ **केंद्र बैठक** : दर महिन्याच्या २२ तारखेला शिवापूरला बैठक होते. ही बैठक १५वर्षांपासून चालू आहे. यात बचत गटांविषयीचे निर्णय होतात. या बैठकिला १० गावांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

♦ **वेल्हे केंद्र बैठक :** वेल्हे परिसरातील २५ गावांच्या प्रबोधिका या दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी एकत्र येतात. गेल्या १५ वर्षांपासून ही बैठक चालू आहे. यात कामाचे नियोजन व निवेदन होते.

◆ **नवदिशा बैठक :** आंबवणे परिसरातील गावांमधील प्रबोधिका कार्यकर्त्यांची दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारी बैठक होते. तुलनेने नव्याने जोडल्या गेलेल्या १५ गावांचा यात समावेश आहे. ही बैठक१ वर्षापासून होते आहे.

या तीनही बैठकींमधून स्थानिक गावपातळीवर पुढाकार घेणाऱ्या ५० प्रबोधिनीच्या महिला प्रतिनिधी आजपर्यंत तयार झाल्या आहेत. गावच्या विकासकामावर यांच्या नेतृत्वाचा ठसा असतो.

यातून आजपर्यंत १२ जणींनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा तर ३ जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली आहे. प्रबोधिनीला अपेक्षित स्थानिक नेतृत्व घडणीची प्रक्रिया या कामातून चालू असल्याचे यातून समाधान मिळते.

**महिला दक्षता समिती : वेल्हे पोलीस स्टेशनशी सलग्न असलेल्या** वेल्हे तालुक्यातील सदस्यांच्या महिला दक्षता समितीचे या वर्षामध्ये दरमहा एक असे १२ प्रशिक्षण वर्ग झाले. यामध्ये दक्षता समितीची कामे, ती करण्यासाठी आवश्यक विविध कौशल्यांचा परिचय, तज्ज्ञ, मार्गदर्शक, समुपदेशक तसेच वकिलांची सत्रे, कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशकांची भेट व त्यांचे मार्गदर्शन, कौटुंबिक न्यायालयास भेट, विविध गावांमधील कौटुंबिक समस्या ऐकून वकिलांनी त्यांना केलेल्या मार्गदर्शनामध्ये सहभागी होण्याची संधी असे विविध उपक्रम केले. तृप्तीताई कुलकर्णी व अंजलीताई भिडे यांनी हा प्रकल्प पुढे नेला. समिती सदस्यांना याचा खूप फायदा झाला.



वेल्हे दक्षता समिती प्रशिक्षण बैठक

**महिला ग्रामसभाः** स्पर्धा परीक्षा केंद्राच्या मदतीने गावांमधील महिला ग्रामसभांचे आयोजन करण्यासाठी स्पर्धा परीक्षा केंद्राचे ३५ विद्यार्थी २५ जानेवारीला गावागावांमधून मुक्कामी राहिले होते. त्या-त्या गावातील युवती व स्थानिक प्रबोधिकांनी सर्व सर्वेक्षणांना मदत केली. गेल्या ४ वर्षांपासून स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांच्या मदतीमुळे गावोगाव महिला ग्रामसभा होत होत्या. या वर्षी काही महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन त्या सभेत विषय मांडणी केली.

## कार्यकर्ता क्षमता विकास

◆ **सुकाणू बैठक :** स्त्री.श.प्र चे प्राधान्याने काम करणाऱ्या विविध विभागाच्या प्रमुखांची बैठक दरमहा पहिल्या आठड्यात होते. यात प्रामुख्याने निवेदने, नियोजन व धोरणात्मक निर्णय होतात.

◆ **मा. संचालकांसमवेत मासिक निवेदन बैठकः** मा. कार्यवाह व मा. संचालकांसोबत दरमहा शेवटच्या बुधवारी सुकाणूतील कार्यकर्त्यांची बैठक होते. यात कार्यकर्ते मा. कार्यवाह व संचालकांना कामाचे निवेदन करतात व त्यांचे मार्गदर्शन घेतात.

◆ **कार्यकर्ता प्रशिक्षण :**

तंत्रज्ञानाच्या साह्याने कामाचे सादरीकरण:- यावर्षी सर्व स्थानिक कार्यकर्त्यांना आपापल्या कामाविषयीचे सदीप व्याख्यान(पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) देण्याची तयारी करण्यास सांगितले. याविषयीचे त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. १४ जणींनी असे तयारीपूर्ण व्याख्यान दिले. आपापल्या कामाचे सादरीकरण त्यांनी केले. यावेळी पुढील विषयांवरील सादरीकरण झाले.

१. किशोरी विकास : अनौपचारिक शिक्षणाचा प्रयोग
२. सहभागातून कृतीकडे : युवती संघटन
३. बचतगट आणि सावकारी पाशातून मुक्ती
४. बचतगट आणि कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सहभाग यांचा परस्पर संबंध
५. बचतगट आणि सक्षमीकरण
६. बचतगट आणि नेतृत्व
७. आर्थिक उलाढाली आणि सक्षमीकरण



या सादरीकरणाच्या वेळी आपले हितचिंतक मा. अनिलराव शहाणे उपस्थित होते.

**प्रशिक्षणांसाठी साधनव्यक्ती म्हणून काम करण्याची संधी:** दरवर्षी कार्यकर्ता प्रशिक्षणासाठी स्थानिक कार्यकर्त्यांना आपण विविध व्यासपीठांवर साधन व्यक्ती म्हणून विषय मांडण्याची संधी देतो. सोस्वा या संस्थेद्वारे महाराष्ट्रभरातील संस्थांसाठी

बचतगटांत काम करणाऱ्या कार्यकर्त्या, बचतगट सदस्य आणि प्रमुख यांच्या साठी प्रशिक्षणे आयोजित केली जातात. त्यामध्ये आपल्या कार्यकर्त्या या साधनव्यक्ती म्हणून सहभाग घेत असतात. हे अशा सहभागाचे ७वे वर्ष.

आपले काम पाहायलाही विविध संस्थांचे कार्यकर्ते येत असतात. त्यांना कामाची माहिती सांगतानाही कार्यकर्ते संयोजकाची भूमिका करतात. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे, त्यांना क्षेत्र भेटींसाठी नेणे यातूनही त्यांचे प्रशिक्षण होते. यावर्षी इनरव्हील क्लब, रोटरी क्लब, निगडी येथील प्रशालेचे शिक्षक, डोंबिवलीचा कार्यकर्त्यांचा गट असे विविध गट येऊन गेले.

**दुष्काळ निर्मूलनाच्या कामांची पाहणी:** वेल्ह्यातील प्रबोधिनीच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीच्याच नैसर्गिक संसाधने विभागातर्फे झालेल्या दुष्काळ निर्मूलनाच्या कामाला भेट दिली. आपल्या गावापासून जवळच परंतु दुर्गम भागात राहणाऱ्या आपल्या मैत्रिणींना डोंगर चढून ओंजळीने पाणी आणावे लागते आहे हे पाहिल्यावर सर्वच कार्यकर्त्यांना परिस्थितीची तीव्रतेने जाणीव झाली. या समस्येकरिता चालू असलेल्या कामात आपण काहीतरी योगदान केले पाहिजे असे त्यांनी ठरविले. वेल्हे तालुक्यातील कोंढाळकर वस्ती, कुसारपेठ,डोपेखिंड व शेनवड या गावी त्यांनी भेटी दिल्या.

**परिषदेत प्रतिनिधित्व :** स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण या विभागातील ४ जणींनी बचतगटातील महिलांसोबत केलेल्या विविध प्रकारच्या अभ्यासाचे निष्कर्ष हे सोलापूर येथे झालेल्या मराठी मानस परिषदेत मांडले. बचतगटातील अनुभवांमुळे महिलांच्या नेतृत्वात झालेले बदल, बचतगटातील अनुभव आणि त्यामुळे कौटुंबिक पातळीवर वाढलेला निर्णय प्रक्रियेतील सहभाग अशा विषयांवरील हे अभ्यास होते. भारती कामठे, आशा सुर्वे आणि तृप्ती कुलकर्णी सहभागी झाल्या. तसेच किशोरी विकास उपक्रमात सहभाग घेतल्यामुळे किशोरींच्या आत्मविश्वासातील झालेल्या बदलावर केलेला अभ्यास मांडण्यासाठी अश्विनी ठाकर गेली होती. तर इस्तंबूल, तुर्कस्थान येथे झालेल्या जागतिक महिला परिषदेत सुवर्णा गोखले यांनी नेतृत्वाचा अभ्यास मांडला.

**प्रवास आत्मविश्वासाचा :** वेल्हे तालुक्यातील सोंडे पट्ट्यामधील सोंडे कार्ले, सोंडे सर्पाले, सोंडे माथना, सुरवड आणि मंजाई आसनी या गावांमध्ये ज्ञान प्रबोधिनी व स्टरलाईट इंडिया या दोहोंच्या संयुक्त विद्यमाने एक प्रकल्प मार्च १४ पासून सुरू झाला आहे. यात या गावांमधील युवती व महिलांसाठी विविध प्रशिक्षण वर्ग व आरोग्याचे मेळावे आणि प्रथमोपचार वर्गांचा समावेश आहे. आजपर्यंत या गावांमधून मेळाव्यांमधून १८० युवती व महिला जागृती कार्यक्रमास उपस्थित होत्या. प्रबोधिनीच्या युवतींनी या गावांमधून युवतींसाठी मेंदी वर्ग किंवा मेंदी मेळावे घेतले व त्या निमित्ताने प्रबोधिनीच्या सर्व कामांची ण

**अलायन्स फॉर ग्लोबल एज्युकेशन :** गोखले इन्स्टिट्यूट आणि ग्लोबल अलायन्स या दोहोंच्या वतीने भारताविषयीचा अभ्यास करायला अमेरिकेत शिक्षण घेणारे विद्यार्थी ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस विभागामार्फत ग्रामीण भागात येतात. ते महिनाभर येथे राहून ग्रामीण भागातील विविध प्रश्नांचा अभ्यास करतात. अलायन्सच्या विद्यार्थीनी गेली ३ वर्षे सातत्याने आपल्यासोबत काम करीत असून आजवर अशा ३ विद्यार्थिनींनी प्रकल्प पूर्ण केले. " बचतगट आणि सूक्ष्मऋणाचा त्यांच्या जीवनावरील परिणाम" असा अभ्यास तसेच "युवतींचे लग्नाचे वय व त्यांचे शिक्षण आणि स्वयंरोजगार यांचा परस्पर संबंध", "दक्षता समिति सदस्यांची कार्यपद्धती व त्यांच्या प्रशिक्षणाचा त्यांना होणारा उपयोग" यासारख्या विषयांवर त्यांनी अभ्यास केला.

*****

### यावर्षी काम करणारा कार्यसंच

| | |
|---|---|
| भारती खासबागे | नेतृत्व |
| आशा सुर्वे | जिजामाता प्रबोधन केंद्र |
| भारती कामठे | स्वयंरोजगार ( शिवापूर ) |
| गंगूताई सांगळे | आरोग्य ( आंबवणे केंद्र ) |
| शैला भोंडेकर | आरोग्य ( वेल्हे केंद्र ) |
| सुरेखा दिघे | स्वयंरोजगार ( वेल्हे ) |
| प्रतिभा कुंभार | युवती समन्वयक |
| अश्विनी कामठे | किशोरी समन्वयक |
| तृप्तीताई कुलकर्णी | हिरकणी |
| आशा गोगावले | महिला समन्वयक |
| हिरा जोर्वेकर | बचतगट समन्वयक |
| स्वाती शिंदे | पुराणिक तंत्रनिकेतन |
| वैद्य मनिषा उपाध्ये | आरोग्य तज्ज्ञ मार्गदर्शक |
| स्नेहा नित्सुरे | प्रकल्प समन्वयक |
| कल्पनाताई कुलकर्णी | दूरशिक्षण |

" वेल्ह्यात माझे हॉटेल आहे. माझ्या चारही मुलींची लग्ने मी माझ्या स्वतःच्या हिंमतीवर या हॉटेलच्या उद्योगामुळे केली. महिन्याला २० रूपये भरण्याचीही माझी ऐपत नव्हती. आज मी लाखो रुपयांची उलाढाल करते.

प्रबोधिनीने आम्हाला आमच्या पलीकडे बघायला शिकवले. आपल्या कार्यालयात वेल्ह्यामध्ये अगदी डोंगरात राहणाऱ्या आणि शिकायची आवड असणाऱ्या पण गाव शाळेपेक्षा लांब असल्याने ज्यांना शिकता येत नाही अशा मुलींचे शिबिर झाले. मी आपली त्या मुलींना लागेल ती मदत करायला वेल्ह्यात त्यांच्या सोबत राहात होते. त्यांचे जेवण पाहणे, त्यांच्याशी गप्पा मारणे असे मी करत होते. बोलता बोलता त्यांची शिक्षणाविषयीची तळमळ मला समजली.शिबिरातील मुलींची शिक्षणाची तळमळ पाहून मी ठरवले, त्यांना शिकायला वेल्ह्यात आणायचे. आज मी अशा ६ मुलींची ' आई' झाले आहे. त्या प्रबोधिनीच्या कार्यालयात राहून वेल्ह्याच्या तोरणा विद्यालयात शिकतात. मला त्यांची आई म्हणवून घेताना खूप आनंद होतो. अभिमान वाटतो.

म्हणतात ना प्रबोधिनीकडून खूप घेतले पण आपण द्यायला कधी शिकायचे? म्हणून मी त्या मुलींसाठी पुढाकार घेऊन त्यांची व्यवस्था केली. मी अंगठाबहाद्दर होते. पण आज माझ्या कामामुळे मी वेल्ह्याची विशेष दंडाधिकारी झाले आहे. शिकलेले लोक माझ्या स्वाक्षरीसाठी आणि शिक्क्यासाठी आज माझ्या हॉटेलात येतात. अगदी शाळामास्तरही येतात! मला लई अभिमान वाटतो त्यांच्या कागदांवर सह्या करताना.

फक्त स्त्रियांसाठी नाही तर पुरुषांसाठीही एक गावातली स्त्री मदत करू शकते.हे मला कोणी आधी सांगितले असते, तर माझाच त्यावर विश्वास बसला नसता. याच वृत्तात तुम्ही दिल्ली सहलीची माहिती वाचाल. त्यातही जेव्हा राष्ट्रपतींना आपण पत्र देऊयात असे ठरले. तेव्हा, त्यांच्याकडे गावासाठी काही न मागता संपूर्ण तालुक्यामध्ये कोर्ट नसल्याने तालुक्याची होणारी परवड थांबवण्यासाठी आमच्या वेल्हे तालुक्यात कोर्ट व्हावे, असे पत्र मी त्यांना दिले. आता स्वतःसाठी, गावासाठी काही मागायचे मनातही येत नाही.....आम्हीही प्रबोधिनीकडून देणाऱ्याचे हात घेतलेत.

**........द्वारका वालगुडे, मु. पो. वेल्ह**

# *दिल्ली अभ्यास सहल*

*दि. २४ ते ३१ मार्च २०१४*

**पार्श्वभूमी** :***ज्ञान प्रबोधिनी अंतर्गत विविध विभागांमधील सदस्य विविध उद्दिष्टांसाठी अभ्यास सहलींना जात असतात.परिस्थिती - ज्ञान करून घेणे, आपण करीत असलेल्या कामाचे जे उद्दिष्ट असेल तसेच उद्दिष्ट असणाऱ्या अन्य संस्थांची कामे पाहणे, त्यांची कार्यपद्धती समजून घेणे, विषेश उल्लेखनीय काम असणाऱ्या व्यक्तींच्या कामाचा परिचय करून घेणे,आपली संस्कृती, परंपरा यांच्या विषयी जाणून घेणे, राष्ट्रीय महत्त्वाच्या वास्तु यांचा परिचय करून घेणे, त्या त्या भागाचे भौगोलिक आणि इतर घटकांमुळे असणारे वैशिष्ट्य व प्रश्न समजून घेणे अशा विविध उद्दिष्टांनी अभ्यास सहली निघतात. त्याचबरोबर सहलीस जाणाऱ्यांची व्यक्तिगत व गट म्हणून असणारी कौशल्ये वाढावीत, आत्मविश्वास वाढावा, माहितीची पातळी वाढावी, यासाठी अशा सहलींचे आयोजन होते.***

**सहलीच्या निमित्ताने :** वयोगट कोणताही असला, तरी अभ्यास सहलींमधून विशेष प्रेरणा घेऊन गट बाहेर पडतात असा आजवरचा आपला अनुभव ! विषेशतः महिलांसाठी एकटीने घराबाहेर पडून काही पाहणे हे तिचा आत्मविश्वास वाढवणारे ठरते हे आम्हाला समजले. मी स्वतः काहीतरी करू शकते याचीही तिला प्रचीती येते आणि मग ही स्वतःविषयी समजलेली गोष्ट ती इतर ठिकाणी वापरून काहीना काही स्वतःच्या हिंमतीवर करण्याचा प्रयत्न करते. तवांगच्या सहलीसाठी गेलेल्या कार्यकर्त्यांच्या मनात आले की आपण पूर्वांचलातील गोष्टी पाहिल्या .तिथले प्रश्न जाणून घेतले ही संधी आपण घेतली.आता आपण ही संधी इतरांना, गावातील महिलांना देऊयात. म्हणून तवांग अभ्यासदौऱ्यामध्ये दिल्ली अभ्यास दौऱ्याची आखणी स्थानिक कार्यकर्त्यांनी केली.

विमान प्रवासाने येणारा विश्वास त्यांनी अनुभवावा म्हणून दिल्ली अभ्यास दौऱ्यात विमान प्रवासही होता.



**आजचा बाळकृष्णही कारागृहातच आहे की :–** मथुरेच्या कृष्णाचे दर्शन झाल्यावर सगळ्याजणी देवळा बाहेर आल्या. लहान-लहान मुले बाळकृष्णाची प्रतिमा विकताना दिसली. बाहेर आलेल्या प्रत्येक भाविकाला पकडून ती प्रतिमा विकत होती. काय रे बाळा शाळेत जातोस का ? या प्रश्नावर प्रतिमा विकणाऱ्या सर्वच मुलांनी शाळेत जात नाही, असे उत्तर दिले. का रे का नाही जात शाळेत असे विचारल्यावर मी प्रतिमा विकून पैसे मिळवतो आणि आईला मदत करतो. बालपण हरवून गेलेल्या मुलांना पाहिलयावर एकजण म्हणाली, अरे या युगातला बाळकृष्णही कारावासातच आहे की ......!

" दिल्लीला गेले. राष्ट्रपतींच्या कार्यालयात एक पत्र दिले. आमच्या गावातल्या अडचणींबद्दल त्या पत्रात लिहिले नाही काही.... त्या आपण सोडवायच्यात.

पण वेल्ह्यात तालुक्याच्या ठिकाणी आम्हाला कोर्ट नाही, ते होण्यासाठी काहीतरी करण्या विषयी लिहिले आहे. "

........दिल्ली सहलीतील एक महिला



स्वतःच्या खर्चाने– जे काही करायचे ते स्वतःच्या खर्चाने असे ठरवून मुद्दाम होऊन दिल्ली अभ्यास सहलीसाठी पैसे बचतगटाद्वारे एकत्र केले. काहींनी कर्जे घेतली. ' मी माझ्या कुटुंबाच्या भल्यासाठी गटाच्या माध्यमातून गेली २० वर्षे काहीनाकाही घरासाठी करत आहे . आता आज अशी वेळ आली आहे, की मी माझ्यासाठी काहीतरी करीन.' असे म्हणून अभ्यास सहलीसाठी बऱ्याचजणींनी कर्ज घेतले. ते आता फेडतही आणले आहे. गेल्या २० वर्षांमध्ये आपल्या कामातून आपण अभ्यास केला पाहिजे, फक्त देवदर्शनासाठी सहल ही पहिली पायरी आहे तर काही गोष्टी शिकण्यासाठीही ती आयोजित करायची, ही पुढची पायरी आहे" हे आपल्या कामाद्वारे महिलांपर्यंत पोहोचवू शकलो हे विशेष !

इथे हे लक्षात घ्यावे लागेल की १५–२० वर्षांपूर्वी जी आपल्या कुटुंबासाठी धडपडत होती, कुटुंबाला वर आणण्यासाठी बचतगटाचा हात हातात घेऊन जिने चार पावले टाकली. कर्जे घेतली, फेडली, वस्तू खरेदी केल्या , मुलांना प्रतिकूल परिस्थितीत शिकवले, ती आज दिल्लीचा राजधानीचे शहर म्हणून अभ्यास करायला जातीय म्हंटल्यावर तिच्या मुला–मुलींनीच नव्हे तर सुना–जावयांनी तिची सर्व तयारी करून दिली. आपली आई किंवा सासू ही दिल्लीत जाऊन संसदेस भेट देणार आहे व राष्ट्रपती भवनात जाणार आहे या गोष्टीचा अभिमान त्यांच्या कृतीतून दिसत होता.

**सहभागी गट :** या सहलीत सहभाग घेतलेल्या सर्व महिला या स्थानिक नेतृत्व करणाऱ्या आणि त्यांच्या भागातील प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या अशा होत्या. कमीतकमी २ वर्षांचा कामाचा अनुभव असलेल्यांपासून १० वर्षे काम करीत असलेल्यांचा हा गट होता.

तालुका सभापती १, एकात्म बाल विकास योजना प्रकल्पाधिकारी १, ग्रामपंचायत सदस्य ३, विषेश दंडाधिकारी २, महिला दक्षता समिती सदस्या ५, आंगणवाडी कार्यकर्त्या ३, प्रेरीका ५,बचतगट प्रमुख १५,आरोग्य कार्यकर्त्या २, प्रशिक्षिका ५.

दिल्लीचा राजधानी या अंगाने परिचय करून घेणे हे या सहलीचे मुख्य उद्दिष्ट होते. त्याला शासकीय कार्यालयांचे व पक्ष कार्यालयांच्या कामाचे स्वरूप जाणून घेणे आणि महिला सक्षमीकरणात काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्तीच्या कामाचा परिचय करून घेणे, अशी जोड होती.दिल्ली येथे महिलांविषयी जाणवलेल्या काही गोष्टी खालील प्रमाणे होत्याः–

• महिलांविषयी आस्था व मदतीची सर्वांची मानसिकता

• रेल्वे स्टेशन, विमानतळावर, रस्त्यांवर महिलांना मिळणारी वागणूक सौजन्याची होती.

• मेट्रोतून एकदम सर्वजणी प्रवास करणार म्हटल्यावर आम्हाला रेल्वे स्थानकावरून मेट्रोच्या महिलांकरिता असलेल्या डब्यात बसवायला एक कर्मचारी स्वतः आले होते.तसेच डबा इंजिन चालकाच्या मागचाच होता. त्यांनी चालकांना सांगितले की सर्वजणी बसल्यावर गाडी सुरू करा आणि सर्व उतरल्यावर पुन्हा चालू करा. असा अनुभव आपल्या महाराष्ट्रात आल्यावर त्यांना आपण देऊ शकलो असतो का? असा मला प्रश्न पडला, असे एकजण म्हणाली.

मथुरेला आल्यावर मथुरेच्या एका पक्ष कार्यालयात फक्त दोन महिला पाहून आणि बाजारातही एकूण विक्रीसाठी आलेल्या किंवा खरेदीसाठी आलेल्या महिला दिसल्या नाहीत. श्रीकृष्णाच्या गवळणी आम्ही देवळात गातो. त्यातील गवळणी त्या काळातही बाजारात जात असत. आज मात्र महिलांची स्थिती तशी दिसत नाही. म्हणजे मधल्या वर्षात काय इतिहास उत्तरेत झाला की महिला आज बाहेर जास्ती पडताना दिसत नाहीत, अशी चर्चा महिलांनी मथुरा भेटीनंतर केली.



**राष्ट्रीय महत्त्वाच्या वास्तू :**

**राजघाट आणि शक्तिस्थल**

कोणतीही महत्त्वाची व्यक्ती राजधानीत आल्यावर ज्या ठिकाणी पुष्पचक्र वाहून पुढे जाताना दाखवतात ते दूरदर्शनवर पाहिलेले राजघाटातील समाधीचे स्थान पहिल्यांदाच पाहिले.

**'हे राम'** ही समाधीवरची अक्षरे वाचल्यावर अंगावर काटा उभा राहिला. सगळ्या जणींनी महात्माजींना मनोमन नमस्कार केला.

**शक्तिस्थलावर** इंदिराजींच्या स्मृतीसाठी उभ्या केलेल्या शीळेसमोर उभे होतो. मन भारावले होते.

**इंदिरा निवासातील प्रदर्शनीस भेटः** प्रदर्शनीतील फोटोंमध्ये अनेक देशातील पंतप्रधानांना इंदिराजी भेटल्या आणि चर्चा केली, हे पाहून अभिमान वाटला. आम्ही सगळ्या ग्रामीण भागातल्या महिला होतो आणि

एका महिला पंतप्रधानांचे कर्तृत्व फोटोतून पाहून अभिमानाने उर भरून आला. त्यांना जेव्हा गोळ्या घातल्या गेल्या तेव्हाची त्यांची वस्त्रे आणि पादत्राणे तसेच खांद्यावरची शबनम पिशवी प्रदर्शनात पाहिल्यावर त्यांच्या साधेपणामुळे मन भारावले. राजीवजींच्या मृत्यूनंतर त्यांची वस्त्रे बॉम्ब हल्यात छिन्नविच्छिन्न झालेली पाहून सगळ्यांमध्ये एक सन्नाटा पसरला. इंदिराजी घरातून बाहेर पडून त्यांच्या कार्यालयात जात असताना त्यांच्यावर जेथे गोळ्या घालण्यात आल्या, ती जागा पाहिल्यावर त्यांनी म्हटलेली वाक्ये आमच्या डोळ्यासमोर आली. आमच्यातल्या एका वेल्ह्याच्या ताईने प्रदर्शनात ती वाक्ये मोठ्यांदा वाचली होती." माझ्यावर हल्ला होणार हे निश्चित. हे माहित असले तरी मी घरात लपून राहून काम सोडून देऊ की काय? हे कधीही शक्य नाही". ते शब्द आमच्या डोळ्यासमोर तरळत राहिले.

**लाल किल्ला :** किल्ल्याची भव्यता आणि किल्ल्यात बसून मोगलांचा इतिहास समोर लाईट आणि साऊंड शोच्या माध्यमातून पाहताना तो इतिहास आपल्या डोळ्यासमोर घडतोय असे वाटले. घोड्यांच्या टापांमधून आक्रमण करणारे सैन्य आणि घरातल्या फंद- फितुरी आणि दगाबाजीने ग्रासलेला बादशहा यांचे जिवंत चित्र उभे राहिले.खटकले ते शिवाजी महाराजांचा बंडखोर असा केलेला उल्लेख! त्यानंतरही स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा इतिहास पाहिला.पंतप्रधान १५ ऑगस्टला भाषण करतात ते ठिकाणही पाहिले.

**शासकीय संस्थाः कृषि अनुसंधान केंद्र**

भारतातील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे शेतीविषयक संशोधन करणारे केंद्र पाहिले. शेती, पशुपालन, विविध तंत्रांचा वापर करून घेतलेले उत्पादन, फुलशेती, कृषी संग्रहालय असे विविध विभाग पाहिले. संशोधन करणाऱ्या अधिकाऱ्यांनी अत्यंत आपुलकीने शेतकरी भगिनींना माहिती दिली.

आम्ही साऱ्या गावाकडच्या शेतकरी म्हणून मुद्दाम ही संस्था पाहायला आलो. संस्था एवढी मोठी की आतल्या आत फिरायला गाडी लागत होती. म्हणे …८०० एकर आहे. म्हणजे दोन गावांएवढेच झाले की. तिथे आम्ही लाल कोबी, रंगीत ढोबळी, हिरवा प्लॉवर असे काय काय पाहिले. पाहावे ते नवलच… प्लॅस्टिकच्या कागदाचे घर करुन थेंबा थेंबाने पाणी घालून कसं पिक काढायचं हे सुद्धा पाहिले. शिकलेली लोकंपण शेतात काम करताना पाहून गंमतच वाटली.एवढ्याशा झाडाला आंबे लागलेले पाहून तर वाटलं, झाड त्यांचं ऐकतं का काय? बघितलेली सुंदर सुंदर फुलं डोळ्यासमोरून जातच नव्हती.......

**सामाजिक संस्थाः गूँज**

लज्जारक्षणासाठी कपडे हे कपड्यांचे महत्त्वाचे काम आहे हे सांगणारी संस्था. संस्थापक अंशु गुप्ता भेटले. शहरातील व्यक्तिंनी स्वतःची गरज भागल्यावर जास्तीचे शिल्लक राहिलेले कपडे व अन्य सामान जर देणगी स्वरूपात दिले तर ग्रामीण भागातील, वस्त्यांमधून राहणारे तसेच नैसर्गिक आपत्तीत अडकलेल्या अशा अनेकांपर्यंत पोहोचता येईल, या साध्या तत्त्वावर चालणारी संस्था. विविध राज्यांमध्ये हे काम सुरूआहे. कपडे, भांडी, स्टेशनरी, मेडिकल साहित्य, खेळणी, बूट चपला अशा अनेक वस्तू येथे स्वीकारल्या जातात. त्यांचे वर्गीकरण करून त्या ज्यांना आवश्यक आहेत तेथे पोहोचवल्या जातात.

कापडातील सुती कापडा पासून सॅनिटरी नॅपकिन्स बनवले जातात. ते ३ वेळा पुन्हा वापरता येण्याजोगे असतात १५ रूपयात ७ नग मिळतात. आजवर ३० लक्ष लोकांपर्यंत हे नॅपकिन्स पोहोचले आहेत. विविध राज्यांमधून संस्थांमार्फत त्या त्या राज्यांतील गरजांप्रमाणे मुलांना कपडे, शाळेच्या बॅग, डबे, वॉटरबॅग, रजया, बूट असे सामान ट्रकलोड होऊन पोहोचते. ज्यांना गरज आहे तेथील समाजोपयोगी कामाद्वारे सामान पोहोचते. उदा. रस्ता बांधायची गरज असलेल्या ठिकाणी रस्ता बांधण्याच्या कामावर या, काम करा, कपडे, भांडी, लग्नाला लागणारा बस्ता असे मोबदल्याच्या स्वरूपात घ्या , असा हा उपक्रम आहे. जास्ती करून या कामात महिला आहेत.

संसदेजवळच अजितराव व ज्योतीताई कानिटकर यांनी महाराष्ट्रसदन मध्ये आम्हाला जेवण दिले.तिथल्या गारव्यात ऐटित बसून जेवताना साहेबच झाल्यासारखं वाटलं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री जर दिल्लीला गेले तर तिथेच राहतात. येथेच पत्रकार परिषदही घेतात, हे टि.व्ही.वर दिसणारं आज प्रत्यक्ष डोळ्यानह्र पाहिलं.

**अक्षयपात्रः** इस्कॉन याा संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या मुलांना शाळेच्या वेळात दुपारचे जेवण पुरविण्याचे काम करणारी संस्था. भुकेमुळे एकाही मुलाचे शिक्षण थांबू नये हा हेतू. काही मुले आणि रस्त्यावरील एक कुत्रे एका पोळीच्या तुकड्यासाठी भांडताहेत हे दृश्य पाहून अस्वस्थ झालेल्या भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी ही संस्था सुरू केली. कर्नाटकातील एका शाळेतील विद्यार्थ्यांपासून सुरू झालेले हे काम आज ९ राज्यांमधून रोज काही लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहे. मोठमोठी यंत्रे, वाफेची शक्ती मोठ्या पाईपलाईन मधून आणून शिजवलेले अन्न, मोठी मोठी पात्रे, पहाटे ६ला १ लाख लोकांचे भात, आमटी, पोळी आणि भाजी करून पोहोचवून सर्व कारखाना स्वच्छ केलेला असतो. त्यांचा वृंदावनमधला आहार यंत्रांच्या मदतीने कसा शिजवला जातो आणि पुरुष माणसं कशा मोठ्या मोठ्या यंत्रांवर हजारो पोळ्या करतात हे महिलांनीप्रत्यक्ष पाहिले. उत्पादनातली अतिशय स्वच्छता सगळ्यांनाच भावली.

आजचा महत्त्वाचा दिवस होता. सगळ्याजणी गणवेषात राष्ट्रपती भवन बघायला निघालो.ताई म्हणाल्या होत्या राष्ट्रपती म्हणजे देशातला पहिला माणूस. मनात विचार आला, कसं असेल त्याचं घर? स्वयंपाकघर कसं असेल ? पाहुण्यांची उठबस करण्याची खोली कशी असेल? .....पाहिलं तर केवढे मोठ्ठे ते घर .... बापरे वाटलं होतं राष्ट्रपतीभवन म्हणजे त्यांचं फक्त घरच असेल. पण इथंतर ते राहतातच पण त्यासोबत मोठे मोठे हॉल आहेत. जिथे देशातले महत्त्वाचे समारंभ होतात, पुरस्कार दिले जातात. परदेशी महत्त्वाचे पाहुणे येतात तेंव्हा संध्याकाळचं जेवण इथल्याच मुघल बागेत होतं. ती बागसुद्धा पाहिली. आपल्या वेगवेगळ्या राष्ट्रपतींना मिळालेल्या भेटवस्तु ठेवलेले दालन संग्रहालय म्हणून केले आहे, ते सुद्धा पाहिले. उर अभिमानाने भरून आले.

**संसद भवनः** टि. व्ही.वर बातम्यांचं संगीत लागल्यावर जे संसद भवन दिसतं, ती देशातील सर्वोच्च संस्था बघितली. सर्वोच्य न्यायालय आतून बघता आलं नाही, ते बाहेरुनच पाहिले पण संसदभवनातील तीनही महत्त्वाची सदने लोकसभा, राज्यसभा आणि केंद्रिय हॉल हे आतून जवळून, त्यातल्या महत्त्वाच्या खुर्च्यांवर बसून पाहता आले. माहिती सांगणाऱ्यांनाही आम्ही सगळ्या बायका बायकाच आहोत हे पाहून तुमच्या बरोबर कोणी पुरुषमाणूस कसा नाही आला ?असे विचारले. कशाला पाहिजे पुरुष? असे आम्ही विचारल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. बायका बायकाच आल्या आणि दिल्लीतील करोलबागेतल्या मार्केटमध्ये न जाता संसदेत कशा ? असे आश्चर्य त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

संसदेत सत्तारूढ पक्षातील सदस्य, पंतप्रधान तसेच विरोधी पक्षातले सदस्य कोठे कोण बसते तेही आम्ही पाहिले. एखाद्या प्रश्नावर मतदानाची वेळ आली तर लोकसभा अध्यक्षांना मतदान करता येते का असा प्रश्न आमच्यातल्या एकीनी विचारल्यावर त्यांना समजले की येणारा गट हा काहीतरी उद्देशाने आलेला आहे.

*****



**घरावर तरी माझे नाव लावाः-**

ताजमहाल पाहून आल्यावर त्याच्या एकूण भव्यतेमुळे आणि विशेषपणामुळे भारावलेल्या सर्वांची चर्चा चालू होती. एवढा मोठा महाल आणि फक्त त्यात कबरच आहे की ग..... कशाला ग एवढे पैसे कबरीवर घालवले बादशहाने, एकीने दुसरीला विचारले. दुसरी म्हणाली, अगं त्याचं प्रेम बघ ना पत्नीवर किती होते ते. पहिली उत्तरली, मी घरी गेल्यावर यांना सांगणार आहे, ताजमहाल बांधण्याची काही गरज नाही पण निदान आपल्या घरावर तरी तुमच्या जोडीने माझेही नाव घाला........!

# तवांग : एक अनुभव

## दि. १२ ते १९ नोव्हेंबर २०१३

***वैद्य मनिषा उपाध्ये***

या कालावधीत एक अभ्यासदौरा अरुणाचल प्रदेशातील तवांग येथे गेला होता. ग्रामीण भागात काम करणाऱ्या ११ कार्यकर्त्यांनी, य़ात सहभाग घेतला होता. तवांगसाठी गोहाटी विमानतळावर उतरून तेजपूरकडे जीपने निघालो. गोहाटी ते तेजपूर हा रस्ता पुणे पनवेल रस्त्याची आठवण करून देणारा होता. तेजपूर येथे विवेकानंद केंद्राच्या मनिषादीदींशी संवाद साधता आला. आसाम मधील बिहू सणाची माहिती, रीतीरिवाज, तरुणांची मानसिकता, सीमावर्ती राज्यांमधील प्रश्न, बोडो आंदोलनाचा इतिहास व त्यामागील कारणमीसांसा सगळे जाणून घेता आले. विवेकानंद केंद्रातील तरूण जीवनव्रतींना पाहून त्यांच्यामधील त्याग आणि देशभक्तीविषयीची जाणीव आम्हाला सर्वांना झाली.

तेजपूर ते तवांग हा ३५० कि.मीचा प्रवास हा फक्त डोंगर डोंगर आणि डोंगर, फक्त प्रवास प्रवास आणि प्रवास अशी आमची स्थिती झाली. तेजपूरपर्यंत एकही डोंगर नाही, दूर क्षितीजापर्यंत फक्त हिरवाई आणि आता फक्त डोंगर, हिरव्या रंगाच्या सर्व छटांनी युक्त. रस्ते खूपच खराब आणि हिमालयाच्या रांगा असल्याने भुसभुशीत चुनखडक आणि जमीन खचण्याचे जागोजागी प्रकार.रस्त्यात १३,२००फुटावरचे सेला पास हे सर्वोच्च ठिकाण पार केल्यावर तवांग येते. तवांग हेही डोंगरावर वसलेले. मोठे रस्ते नाहीत आणि चढण. बाजारात जायचे तरी रोज एक गड चढायचा आणि उतरायचा. सर्वत्र स्वच्छता आणि बौद्ध धर्माचे प्रतीक असलेले पांढरे व इतर पांचभौतिक झेंडे. येथे वॉर मेमोरियल पाहिले, जे भारतात कुठेही नाही. चीन बरोबरच्या युद्धात हुतात्मा झालेल्या अनेक सैनिकांची नावे येथे लिहिलेली आहेत. हे शांतीचे प्रतीक म्हणून समजते जाते. येथे शिवाजी महाराजांचा पुतळाही आहे.



बुम्लापास आणि लुम्लापास येथे अनुक्रमे चीन आणि भूतान यांची सरहद्द आहे. त्यामुळे तेथे जायला आधी परवानगी काढावी लागते. आम्ही लुम्ला येथे कस्तुरबा गांधी मुलींची निवासशाळा पाहिली. सर्व मुलींच्या खोल्या स्वच्छ, सामान व्यवस्थित लावलेले आणि अत्यंत समाधानी मुली. येथे शिकणाऱ्यांच्यात काही मुली पहिल्या पिढीच्या शिकत आहेत.चालत गाडीने ३ दिवसांचा प्रवास करण्याच्या अंतरावरून आलेल्या आहेत. दुसऱ्या शाळेतही शिस्तीचे दर्शन आम्हाला झाले. घंटेच्या एका ठोक्यात सर्व मुली एकत्र आल्या आणि त्यांनी सुंदर गाणे चालीवर म्हंटले.

मंजुश्री विद्यापीठ या अनाथांच्या शाळेला भेट दिली. यात ३ ते १४ वयोगटातील मुली राहात व शिकत होत्या. पहाटे ४ ते रात्री ९ असा त्यांचा रोजचा कार्यक्रम शिस्तीत चालत असे. या शाळेत डिसेंबरमध्ये बर्फ असते. फक्त २ महिने उन्हाळा असतो.निधीची कमतरता, नैसर्गिक असमतोल अशा अडचणी असूनही या शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमरजी यांची मुलांप्रती असलेली निष्ठा पाहून त्यांना सलाम ठोकावासा वाटला.

सहा दिवसांच्या दौऱ्यात आमच्या पुढील गोष्टी लक्षात आल्याः-

- सर्वच महिला या काम करताना दिसतात. भाज्या - वस्तूची दुकाने चालवणे ते पाथरवटाचे काम करणे अशी कामाची विविधता होती. मुलांना सहज पाठंगुळी बांधून त्या काम करीत असतात.
- एकही वजनाने जास्ती असलेली स्त्री आमच्या पाहण्यात आली नाही, कारण कष्टच एवढे होते. मैदा, मीठ साखर, तेल, तूप या पाच गोष्टींचे सेवन नसल्यामुळे त्यांची त्वचा खूप ताजी होती.

**अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो .....**

एक कार्यकर्ती म्हणाली, 'ताई, पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यात काम करताना बायका जेंव्हा म्हणायच्या 'ताई, ४ तास चालून इथवर आलेय', 'ताई ६ तास चालून ओढा ओलांडून इथवर आलेय ' तेंव्हा वाटायचं काय इपरीत परिस्थिती आहे. ' आज जेंव्हा या बायकांनी सांगितले की ३ दिवस चालत गेल्यावर माझे गाव लागते. तेंव्हा वाटले की आपल्या कामाची इथेच जास्ती गरज आहे. आपण काही करू शकू का यांच्यासाठी?

त्यांच्या वयाचा अंदाज येत नव्हता.

- तेजपूर ते तवांग आम्हाला एकही दवाखाना दिसला नाही.
- ह्या समाजातील स्त्री-पुरुष हे चालताना, बसलेले असताना देवाचा जप करताना दिसले. तर पाथरवटाचे काम करणाऱ्या स्त्रिया जेवणाच्या सुट्टीत स्वेटर विणताना दिसल्या. चालतानासुद्धा स्त्रिया स्वेटर विणीत होत्या.
- तवांगमध्ये आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची मॉनेस्ट्री आहे. येथील समाजात घरातील मधला मुलगा हा धर्मासाठी किंवा देवासाठी देण्याची प्रथा आहे.



- मुली मात्र स्वेच्छेने धर्माचे काम करताना दिसतात.
- भात बटाटाभाजी व हरभराडाळीचे वरण हेच मुख्य अन्न. निसर्गाची साथ नाही, सरकारचे दुर्लक्ष, चीनची घुसखोरी, रस्ते वीज यांची वानवा, आहारातील तोचतोचपणा अशा गैरसोय़ीतही ते आनंदी दिसतात.अशा सुदूर ठिकाणी राहणाऱ्या आपल्या मित्रांसाठी आपणही काहीतरी केले पाहिजे अशी भावना घेऊन आम्ही परत फिरलो.
- त्यांचे घर ते स्वतः बांधतात. डोंगरातून दगड-माती खणून आणण्यापासून ते झाडापासून फळ्या बनवण्यापर्यंत सगळे काम ते स्वतः करतात.

*****

# बोरीवलीच्या अपूर्वा राणेचे काम

या वर्षीच्या कामामध्ये बोरीवली ज्ञान प्रबोधिनीच्या अपूर्वा राणेच्या कामाची उत्तम भर पडली. समाजशास्त्र आणि अर्थशास्त्रात पदवी मिळवलेल्या अपूर्वाला प्रत्यक्ष ग्रामीण भागात जाऊन काम करायचे होते. तिने वर्षभर खूप उत्तम पद्धतीने काम केले. प्रथम ६ महिने सर्व विभागांमध्ये म्हणजे किशोरी , युवती आणि महिला या विभागांमध्ये कामाचा अनुभव घेतला आणि नंतर युवती विभागामध्ये ६ महिने महत्त्वाचे काम केले.

**युवतींसाठी कौशल्य वर्ग आणि स्वयंरोजगाराच्या कौशल्यांचा अनुभव:** अपूर्वाने शाळेपर्यंत पोहोचलेल्या युवतींसाठी व्यक्तिमत्त्व विकसन तासिका घेतल्या. शाळेपासून काही कारणाने दूर असलेल्या युवतींसाठी स्वयंरोजगाराचे कौशल्य त्यांनी मिळवावेम्हणून कौशल्य तासिका योजल्या. युवतींनी कामाचा अनुभव व प्रशिक्षण घेताघेताच चार पैसे मिळवावे यासाठीही काम केले.

अपूर्वा अत्यंत मनापासून गावागावांमधील युवतींपर्यंत पोहोचली. ती असल्यामुळे युवतींच्या घरी राहून पालकांशी संपर्क करून आणि युवतींच्या अडचणी समजून घेत काम झाले. नेहमी मोठ्या ताईंशी संवाद करायला लागणाऱ्या युवतीही वयाने त्यांच्या एवढ्या अपूर्वा ताईशी मोकळेपणाने संपर्क करु लागल्या.

ग्रामीण भागातील युवतींनी चार पैसे मिळवले तर त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांची लग्नेही उशीरा होण्यासाठी त्यांच्या कामाचा त्यांना उपयोग होईल, हे ओळखून तिने मुलींना पुण्यातील ख्यातनाम अशा दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये कामाचा अनुभव आणि त्यासोबत चार पैसे मिळवण्याची संधी मिळवून दिली. यासाठी त्यांच्या पालकांना भेटणे, त्यांना या उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगणे, मुलींशी या विषयावर बोलणे, त्या दुर्गम भागातून पुण्यापर्यंत पोहोचल्या की त्यांच्या राहण्याची व्यवस्था करणे, त्यांच्या सुरक्षेसाठी त्यांच्या सोबत राहणे, त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे अशी अनेक कामे तिने आनंदाने त्यांच्यासाठी केली. साधारण १५ गावांमधील ५० युवतींपर्यंत पोहोचल्यावर तिने पुण्यात अशा प्रयोगासाठी ९ युवतींना निवासासाठी आणले. त्यातील ४ जणी आजमितीस रुग्णालयात काम करीत आहेत.

आज तिच्या सोबत आलेली अर्चना बलकवडे नावाची कुंबळे या दुर्गम गावातून आलेली युवती पुण्यात राहून स्वतःच्या पायावर उभी आहे. ती एकदम घराबाहेर पडली नसती. अपूर्वाने तिला सुट्टीत एक महिना प्रबोधिनीत कामाला आणले. राहायलाच ती प्रबोधिनीत आली आणि आज तिचे विश्व विस्तारले.

कौशल्य वर्ग, साहस सहली, अभ्यास सहली, शिबिरे आणि आता पुण्यातील पालकांपासून लांबचा असा निवास. खरेच

छोटे छोटे बदलच मोठ्या बदलाचा मार्ग शोधतील!

युवतींच्या साहस सहली आयोजित करणे, त्यांना गडांवर नेण्यासाठी प्रथमच घराच्या बाहेर काढणे, त्यांच्या बरोबर त्यांच्यातलीच एक बनून त्यांच्या महाविद्यालयात त्यांचे विविध प्रकाराने तास घेणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे असे काम तिने त्यांच्याशी समरस होऊन केले. **दुर्गम भागातील किशोरींनी शिकावे यासाठी प्रयत्न: मुलींचे शिबिर:** शिकण्याची इच्छा असणाऱ्या व त्यासाठी स्वतःचे घर सोडून वेल्ह्यात येऊन राहण्याची तयारी असणाऱ्या दुर्गम भागातील गावांमधील ३५ मुलींचे शिबिर घेतले. वेल्हे तालुक्यातील दुर्गम भागातील ४ गावांमध्ये जाऊन, तिथे मुलींच्या घरी राहून अपूर्वाने त्यांच्या पालकांना आणि त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अशा ३५ मुलींचे शिबिर घेऊन तिने त्यांची मानसिकता तयार केली. मला शिकायचे असेल आणि शाळा लांब असेल तर मी शाळेपर्यंत जायला पाहिजे अशी ऊर्मी तिने मुलींमध्ये तयार केली. हे अवघड काम अगदी सहजपणाने तिने केले.



तीन दिवसांच्या या शिबिरात तिने शिक्षणासाठी घरापासून दूर राहण्याची मुलींची मानसिकता व्हावी यासाठी प्रेरणा सत्रे तर घेतलीच, पण मुलींची कामाची तयारी किती आहे, गटात राहायचे झाले तर एकमेकांशी जुळवून घेण्याची शक्ती कोणाकोणात आहे, कोण मुलींमध्ये नेतृत्व करू शकेल याचा अंदाज घेतला.

**आज वेल्ह्याच्या प्रबोधिनीच्या निवासकक्षात ६ विद्यार्थिनी राहात आहेत.** त्यांच्यासोबत एक महिला कार्यकर्त्याही पूर्णवेळ राहात आहे. याचे सर्व श्रेय अपूर्वाच्या कामाला जाते.



**दिल्ली अभ्याससहल पूर्वतयारी:** महिलांच्या दिल्ली अभ्याससहलीची पूर्वतयारी अपूर्वा राणे आणि अश्विनी ठाकर या दोघींनी केली. सगळे काम दोघींनी सहलपूर्व दिल्लीस भेट देऊन केले. एखादी अभ्याससहल कशी आयोजित करायची याचे ते चांगले उदाहरण ठरले.

स्वतःचे शिक्षण चालू असतानाच, प्रबोधिनीत जे शिकलो ते स्वतः करून पाहायचे या विचाराने एक वर्ष कामासाठी दिलेल्या अपूर्वाचे उदाहरण तिच्या वयाच्या सर्वांपुढेच अनुकरणीय असे आहे.

****

## या सर्वांच्याच ऋणात राहणे आम्हाला आवडेल.

**स्वयंसेवी योगदान :** या विभागाचे काम करणाऱ्या नियमित कार्यकर्त्यांबरोबरच प्रबोधिनीतील आणि प्रबोधिनी बाहेरील अनेकांनी स्वयंसेवी वृत्तीने या विभागाच्या कामात केलेले अनेकविध प्रकारचे योगदान हे यावर्षीचे अत्यंत महत्त्वाचे असे वैशिष्ट्य आहे. प्रबोधिनीच्या विविध विभागांशी ९० उपक्रमांमधून स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) हा विभाग जोडला गेला. कुणी आपला वेळ दिला, कुणी कल्पना दिल्या, कुणी वस्तूरूप देणगी दिली तर कोणी भागात जाऊन शिबिरे घेतली. येथे चाललेले काम अधिक सघन आणि योग्य दिशेने जाण्यासाठी त्या त्या विभागाची मदत झाली.

नोकरी देण्याच्या निमित्ताने दीनानाथ रुग्णालयाचा संपर्क आला आणि मी प्रशिक्षण घेताघेताही पैसे मिळवू शकते हा विश्वास येथील युवतींना मिळाला. निगडीचे पालक सहलीसाठी आले, तर डोंबिवलीचा गट शाळांमध्ये प्रशिक्षण घ्यायला आल्या.

स्पर्धा परीक्षा केंद्राने मुद्दाम होऊन या भागात आयोजित केलेल्या शिबिरामुळे ग्रामीण भागातील दोन युवतींना रॅपलिंग व रिव्हर क्रॉसिंगचा अनुभव घेता आला. स्पर्धा परीक्षा विभागातील ३५ जणांनी येथे निवासी राहून १७ गावांमध्ये महिला ग्रामसभा होतील असे पाहिले. असे हे त्यांच्यासोबतचे ४थे वर्ष. त्यामुळे या भागातील महिला ग्रामसभांचे प्रमाण वाढले आहे व ग्रामसभांमधील त्यांची उपस्थितीही वाढली आहे. निगडी प्रशालेतील मुलांनी घेतलेल्या गावपातळीवरील शिबिरांमुळे येथील किशोरी विकास व युवतीं कार्यकर्त्यांमध्ये अशा गावपातळीवरील कार्यक्रमांच्या आयोजनाचा अनुभव, बळ आणि स्वतंत्रपणे असे आयोजन आपण करू शकतो याचा आत्मविश्वास मिळाला. संवादिनीताल असंख्य मैत्रिणी ग्रामीण भागात येत असतात. त्यांच्यामुळे कायदेविषयक समुपदेशन, तरूण मुलामुलींना पडणाऱ्या मैत्रीविषयीच्या अवघड प्रश्नांना उत्तरे मिळाली.

## ★ ऋणनिर्देश ★

### कामातील विशेष योगदान

- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. शांताराम दत्तात्रेय पटवर्धन यांनी मोलाच्या अर्थसाहाय्याबरोबरच विविध कामांच्या कल्पना सुचविल्या.
- पुण्यातील विविध व्यक्ती व संस्थांकडून मुलींच्या शिक्षणासाठी मोलाचे असे अर्थसाहाय्य शिष्यवृत्त्यांच्या माध्यमातून प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या विजयाताई रसाळ यांनी संपूर्ण वर्षभर प्रयत्न करून उभे केले. दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणाबरोबरच यावर्षी त्यांनी दुर्गम भागातील बालवाड्यांसाठी योगदान उभे केले.
- पाटणकर ट्रस्टद्वारे गेल्या ८ वर्षापासून आंबवणे येथे गरोदर महिलांसाठी तपासणी केंद्र चालवले जाते. अव्याहतपणे दरमहा एक दिवस ६ तज्ज्ञांचा एक गट येथे येतो आहे. अंबवणे केंद्राजवळील ६५ गावांमधून दरवर्षी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी महिला येत आहेत.
- पुण्यातील वेगवेगळ्या इनरव्हील क्लब व रोटरी क्लब या संस्थांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आर्थिक योगदान दिले. काही व्यक्तींनी स्वतःचा वेळ दिला. या व ज्यांचा नामोल्लेख नाही अशा सर्वांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य झाले.

***या सर्वांप्रती आम्ही ऋणी आहोत.***

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**



गडावरच्ड्ढा सहलीमध्ड्ढे इतिहासाचा तर तास नाही ? ड्ढवती सहलीतील दृश्ड्ढ


प्रेषक :

**ज्ञान प्रबोधिनी**

**स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

दूरभाष क्र. २४२०७१६२, २४२०७०००

e mail : ssprabodhan@jnanaprabodhini.org